बुधवार, 02 नोव्हेंबर 2022
⊙ किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - 02 ⊙ अंक -84
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● WEDNESDAY 02 NOVEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-84 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-12 ● PRICE-5




## बल्क ड्रग पार्कविरोधात शेतकऱ्यांचा मोर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**अलिबाग: मुरुड आणि रोहा तालुक्यातील प्रस्तावित बल्क ड्रग पार्क विरोधात शेतकऱ्यांनी अलिबाग येथील जिल्हाधिकारी कार्यालयावर मंगळवारी सकाळी मोर्चा काढला. कुठल्याही परिस्थितीत प्रकल्पासाठी जागा देणार नसल्याचा निर्धार त्यांनी यावेळी बोलून दाखवला.**

चितामणराव केळकर विद्यालयापासून मोर्चाला सुरवात झाली. शेतकरीभवन, बालाजी नाका, मारुती नाका मार्गे मोर्चा जनरल अरुणकुमार वैद्य विद्यालयासमोर दाखल झाला. या ठिकाणी पोलीसांनी मोर्चा अडवला. मोर्चाचे छोटेखानी सभेत रुपांतर करण्यात आले. प्रकल्प विरोधी शेतकरी समितीच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी यावेळी मोर्चाला संबोधीत केले. यानंतर भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष महेश मोहीते यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन निवेदन दिले. या प्रकल्पाला शेतकऱ्यांनी सुरवातीपासूनच विरोध केला आहे. शेतकऱ्यांच्या पिकत्या जमिनींबरोबरच राहती घरेही, वाड्या वस्त्याही संपादीत केल्या जाणार आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना बेरोजगारी बरोबरच बेघर होण्याची वेळ येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा या प्रकल्पाला विरोध असल्याचे अँड. महेश मोहीते यांनी सांगितले. त्याच बरोबर जिल्ह्यात यापुर्वीही एमआयडीसीच्या मार्फत अनेक ठिकाणी भुसंपदान करण्यात आले आहे. पण त्याठिकाणी प्रकल्प आलेले नाहीत. शेती गेली आणि प्रकल्प आले नाही, रोजगार मिळाले नाहीत आणि लोक देशोधडीला लागले त्यामुळे या कुठल्याही परिस्थितीत प्रकल्पासाठी जागा देणार नसल्याचा निर्धार यावेळी शेतकऱ्यांनी बोलून दाखवला.

### चर्चेतली बातमी

## पीएफवर लवकरच व्याज जमा होणार

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** कर्मचारी भविष्य निर्वाह निधीच्या खात्यात मागील आर्थिक वर्षीचे व्याज अद्यापही जमा न झाल्याने खातेधारकांच्या मनात अनेक शंका निर्माण झाल्या होत्या. मात्र, या गोंधळावर भविष्य निर्वाह निधी संघटनेने स्पष्टीकरण दिले आहे. ईपीएफ खातेधारकांच्या पीएफवर लवकरच व्याज जमा होणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेने सोमवारपासून 2021-22 या वर्षातील व्याज जमा करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. जमा करण्यात आलेले व्याज लवकरच लाभार्थ्यांच्या खात्यांमध्ये दिसून येणार असल्याचे ईपीएफओकडून सांगण्यात आले आहे. मागील आर्थिक वर्षातील व्याज जमा न झाल्याने पीएफ खातेधारकांच्या मनात प्रश्न निर्माण झाले होते. ईपीएफओने व्याज जमा करण्याची प्रक्रिया सुरू झाली असल्याचे सांगितले. लवकरच व्याज जमा करण्यात येणार असून पूर्ण रक्कम दिली जाणार असल्याचे सांगण्यात आले. ईपीएफओकडून व्याज जमा करण्यासाठी उशीर झाला आहे. सॉफ्टवेअर अपग्रेड करण्यात येत असल्याने अद्याप व्याजाची रक्कम जमा झाली नसल्याचे सांगण्यात येत आहे.

## दुर्घटनास्थळाची पाहणी



मोरबी दुर्घटनास्थळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भेट दिली आहे. यावेळी त्यांनी बचाव आणि मदत कार्यात सहभागी असलेल्या लोकांची भेट घेतली.

## जालन्यातील स्टील कंपनीत स्फोट

### दोन ठार; चार गंभीर जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** जिल्ह्यातील औद्योगिक वसाहतीतल्या स्टील कंपनीत भीषण स्फोट झाला आहे. दुर्दैवाने या स्फोटात दोघांचा मृत्यू झाला असून चार जण गंभीर जखमी झाले आहेत. गंभीर जखमींवर औरंगाबाद येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार मंगळवारी दुपारी 12 वाजेच्या सुमारास जालना जिल्ह्यातील औद्योगिक वसाहतीतल्या गीताई स्टील कंपनीत लोखंड वितळणाऱ्या भट्टीत अचानक स्फोट झाला. स्फोटाची क्षमता एवढी भीषण होती की, त्यात भट्टी पूर्णपणे उध्वस्त झाली आहे. त्यामुळे आजूबाजूला काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या अंगावर वितळलेले लोखंड पडले. ज्यात ते गंभीर जखमी झाले होते. यातील दोघांचा दुर्दैवाने मृत्यू झाला असून, आणखी चौघांची प्रकृती चिंताजनक असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.




## दिवाळीच्या सुटीत अजिंठा लेणी बघण्यासाठी तोबा गर्दी

### एकाच आठवड्यात सुमारे 22 हजार पर्यटकांनी दिली ऐतिहासिक अजिंठा लेणीस भेट


आधुनिक केसरी न्यूज

संदीप मानकर

अजिंठा : जगप्रसिद्ध असलेली अजिंठा लेणी बघण्यासाठी देशी-विदेशी पर्यटक हजारोंच्या संख्येने गर्दी करतात परंतू गेल्या दोन वर्षांपासून संपूर्ण जगांवर निर्माण झालेल्या कोरोना महामारीच्या संकटाने पर्यटन विकास महामंडळ व भारतीय पुरातत्व विभाग यांच्या वतीने अजिंठा लेणी पर्यटकांसाठी बंद ठेवण्यात आली होती. मात्र काही दिवसांपूर्वी शासनाने व प्रशासनाने कोरोनाचे सर्वच निर्बंध हटविल्याने आता ही लेणी पर्यटकांसाठी खुली करण्यात आली आहे. आणि याच अनुषंगाने दिवाळीच्या सुट्टीत रविवार ते रविवार या आठ दिवसांत सुमारे 22000 पर्यटकांनी लेणी बघितली. यांमुळे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ व महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाला लाखो रुपयांचे उत्पन्न मिळाले. या कालावधीत सोयगांव



आगाराच्या एकूण 12 बस चालविण्यात आल्या असून 12 चालक व 11 वाहक सोबत उपस्थित होते. तर आठ दिवसांत एकूण सहा लाख सत्तर हजार रुपये उत्पन्न झाल्याची माहिती येथील अधिकाऱ्यांनी "दैनिक आधुनिक केसरीशी" बोलतांना दिली. मात्र शिवशाही, एशियाड व हिरकणी बसने पर्यटकांचा प्रवास करुन भाडे मात्र प्रदूषण विरहित बसचे घेतले जात आहे व पर्यटकांची मोठ्या प्रमाणात लूट केली जात असल्याची भावना पर्यटकांनी यांवेळी व्यक्त केली. कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यांसाठी अजिंठा लेणीत प्रवास करणाऱ्या व गुहेत जाणाऱ्या पर्यटकांची भारतीय पुरातत्त्व विभाग व सुरक्षा रक्षकांच्या वतीने बारकाईने तपासणी केली गेली. यांवेळी पोलीसांनी चोख बंदोबस्त ठेवला. तर पर्यटकांच्या गर्दीमुळे फर्दापूर टी पॉईंट शॉपिंग प्लाझा येथील फेरीवाले, हॉटेल, व दुकानदारांचा व्यवसाय दुपटीने वाढल्याने सर्व दुकानदारांनी समाधान व्यक्त केले.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# गाथा एका शूरवीराची

आधुनिक केसरी


असीम शौर्य आणि त्यागाने भरलेली आहे. ठरवलं असतं तर हेमंत स्वतःसाठी ऐषारामाचं जीवन जगू शकले असते. पण राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुशीत हा शंभर नंबरी सोन्याचा दागिना घडला होता. प्रतिकूल परिस्थितीच्या आगीत भाजून निघाल्यानंतर हे सोने आणखीनच उजळून निघाले.

नुकताच आपण स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा केला. देशाला ज्यांनी स्वातंत्र्य मिळवून दिले त्यांच्या त्यागाची फळे स्वातंत्र्याच्या रूपाने आज आपण चाखत आहोत. या सगळ्या देशभक्तांचे, शूरवीरांचे बलिदान, त्याग यांचे स्मरण यानिमित्ताने ठेवणे हे आपले परमकर्तव्य ! या स्वातंत्र्ययज्ञात अनेकांच्या आयुष्याच्या समिधा अर्पण केल्या गेल्या. त्यातले काही आपल्याला माहिती असतात तर काहींचे योगदान अज्ञात असते. अशाच तेजस्वी देशभक्तांपैकी हेमंत सोमण हे एक नाव ! आजच्या पिढीला फारसे परिचित नसलेले. पण त्यांच्या या महान कार्याचा परिचय करून दिला त्यांच्या भगिनी कालिंदिताईंनी. योगायोगाने २०२२ हे वर्ष म्हणजे हेमंत सोमणांची जन्मशताब्दी. या पुस्तकाच्या रूपाने एका बहिणीने भावाला वाहिलेली ही अनोखी आदरांजली आहे.

सरदार पटेलांनी जरी स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी भारतात अनेक संस्थाने विलीन केली तरी पुदुचेरी ( पूर्वीचे पॉण्डेचेरी ) हे राज्य फ्रेंचांच्या ताब्यातून भारतात १९५४ मध्ये विलीन झाले. गोवा, दीव आणि दमण हे भारतात विलीन होण्यासाठी मात्र भारतीयांना १९६१ पर्यंत वाट पाहावी लागली. गोवा पोर्तुगीजांच्या ताब्यात होता. त्यापूर्वी भारत सरकारने तेथे लष्कर पाठवून कारवाई केली असती तर गोवा कधीच भारतात विलीन झाला असता आणि त्यासाठी ज्या ज्या देशभक्तांनी आपल्या प्राणांची आहुती दिली ती द्यावी लागली नसती. तत्कालीन पंतप्रधान पं नेहरू यांनी ती कारवाई करण्याचे टाळले. **(क्रमशः)**



क्रांतिसूर्य हेमंत लक्ष्मण सोमण



# आनंदी पहाट

## मन:शक्तीचे महत्त्व

आधुनिक केसरी

आजच्या गतिमान, आधुनिक आणि स्पर्धेच्या युगात अन्न, वस्त्र आणि निवारा या किमान प्राथमिक गरजांचा विचार करून फक्त चालत नाही, तर बदलत चाललेल्या जीवनमुल्यांचाही स्विकार करावा लागतो. आज आपल्या आयुष्यातील प्रत्येक सुखात आणि दुःखात आपल्याला शारीरिकदृष्ट्या साथ-सोबत करणारे, मानसिक आधार देणारे, अंतर्मनाला धीर देणारे, आर्थिकदृष्ट्या सक्षमता देऊ करणारे, सामजिक पत निर्माण करणारे, शैक्षणिक प्रगतीची दिशा दाखवणारे, कौटुंबिक एकोपा टिकवणारे, आपली नातीगोती जपणारे, उणीवा दूर करणारे, आपल्या जाणीवा जपणारे, आपल्या जाणीवांना नेणीवेपर्यंत घेवून जाणारे, आपल्या जीवनात अत्यंत महत्वाची भूमिका बजावणारे आपले हक्काचे साधन हे दुसरे-तिसरे कोणतेही नसून ते म्हणजे आपले मन. आपल्या सर्वांच्या जीवनात अत्यंत महत्वाचा आणि जिव्हाळ्याचा विषय म्हणजे आपली मनाची शक्ती. ह्या मनाच्या शक्तीचा थेट संबंध आपल्या भाव भावनांशी असतो. अन्न, वस्त्र आणि निवारा ह्या तीन मुलभूत गरजांची पूर्तता खरे तर शरीरासाठीच होत असते. पण मनाचे काय ? ते दिसत नसले तरीही असतेच. आपल्या जगण्यापलीकडच्या जीवनाला मनामुळे वेगळे असल्याची प्रचीती येते. काहीवेळा असे वाटते की, अनेकांकडून केवळ शरीरासाठीच सर्वकाही केले जाते. पण मनाचा, मनातल्या मनात, मनमुरादपणे किंवा मनमारून मनपसंद असा कधी विचार खररेच होतो का? निदान तसे दिसत तरी नाही. मनंच आपल्याला जगायला शिकवते, मनंच आपल्याला पदोपदी अनेकविध निरनिराळ्या प्रसंगांची अनुभूती देते. दुसऱ्याच्याच काय पण आपल्या स्वतःच्या मनाचा सुद्धा थांग पत्ता लागणे मुश्कील असते. आपल्या शरीरावर ताबा ठेवून त्याला स्थिर करू शकतो पण मनावर नियंत्रण ठेवणे मोठे कठीण काम असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## ठाव दे केशवा | चरणासी ||

देखिले म्या डोळा | मंगल चरण ||
रूप ते सगुण | कैवल्याचे ||१||

चंदन कस्तुरी | शोभे भाळावरी ||
तुळस मंजिरी | रूळे गळा ||२||

विटेवरी उभा | देव भक्तांसाठी ||
चंद्रभागे तटी | परब्रह्म ||३||

मना लागे ओढ | देह हा पंढरी ||
चैतन्याची वारी | श्वास झाला ||४||

आता कैसी आस | उरली न देवा ||
ठाव दे केशवा | चरणासी ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# "निरुपण"

आधुनिक केसरी

## सद्गुरुमहिमा

गुरुविण बोले काही ऐसी माझी शक्ती नाही।
तयाचिये संगे राहे माझे सुख सर्व काही।।
धन्य कूस सजुबाई यशवन्ती मायबाई।
धन्य कुळ योगानंदी टाळी लागे ब्रह्मानंदी।।
नाही चुकविली वारी कोणती लबाडी नाही।
नाव भगवान शोभे सरस्वती त्यांची राही।।
गुरूचे हे थोर कर्म शिवशक्ती ऐक्य पाही।
रेणुकाविठुगुरवे अर्पियले सर्वकाही।।
रंगनाथभगवान साजे ऐसी रे मैतरी।
देहदुजे एक प्राण कंठी रामकृष्ण हरी।।
पुण्य आले फळासिया गुरुमाळ माझे कंठी।
काय करू मुक्ताहारे पितामही गुरुमाई।।
चंद्रहासे कृपा केली वाणी प्रसादे दिधली।
भक्तीसी करी जवळी आज्ञा गुरूने हो केली।।



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# भगवत्कृपेचा लोंढा म्हणजे काय ?



आधुनिक केसरी

कोणतेही बी पेरताना ते अत्यंत शुद्ध असावे; म्हणजे किडलेले किंवा सडलेले नसावे. भगवंताशिवाय दुसऱ्या कोणत्याही फळाच्या हेतूने केलेली भक्ति ही सडलेल्या बीजासारखी आहे. आता, सुरुवातीलाच उत्तम बी पैदा होईल असे नाही, परंतु प्रयत्नाने ते साधता येते. पुष्कळ वेळा काही तरी ऐहिक सुखाच्या इच्छेने मनुष्य भक्ति करायला लागतो; म्हणजे त्यावेळी तो सडके बीज पेरीत असतो. प्रारंभी अशा तऱ्हेचे काही तरी निमित्त होतच असते, परंतु थोड्याशा विचाराने, शुद्ध बीजाची पेरणी होणे जरूर आहे असे चित्ताला पटते. भगवंताची तशी अनन्य भावाने प्रार्थना करावी. पाऊस पडणे वा न पडणे ही गोष्ट सर्वस्वी भगवंताच्या स्वाधीन आहे, आणि तो यथाकाळ पडतोही. असे पाहा की, एखादे शेत खोलात असले की त्यात पाणी इतके साचते की, ते जर बाहेर काढून लावले नाही तर सबंध पीक कुजून जाते. त्याच अर्थाने भगवंताच्या कृपेचा लोंढा जर जोराचा असला तर बंधारा फोडून तो बाहेर सोडणेच जरूर असते. असे करण्यात दोन्हींकडून फायदा असतो. एक म्हणजे शेतात जास्त झालेले पाणी बाहेर काढून लावल्याने शेतातले पीक न कुजता उत्तम वाढते; आणि दुसरे म्हणजे, हे बाहेर घालविलेले पाणी आजूबाजूच्या शेतात पसरून तिथलेही पीक वाढवायला मदत होते. बंधारा फोडून पाणी बाहेर लावणे याचेच नाव परोपकार. साधकाची जशी प्रगती होत जाईल त्याप्रमाणे मध्यंतरी सिद्धी प्राप्त होऊन, बोललेले खरे होणे, दुसऱ्याच्या मनातले समजणे, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी अदृश्य गतीने जाणे, इत्यादि प्रकार घडू लागतात. अशा वेळी मोहाला बळी न पडता, त्यांचा उपयोग स्वार्थाकडे न होईल अशी खबरदारी घेणे जरूर असते. उपयोग करायचाच झाला तर दुसऱ्याचे काम करण्यात, परोपकारांत व्हावा; यालाच बंध फोडून पाणी बाहेर लावणे असे म्हणता येईल. शहाण्या माणसाने आपले सुख बाहेरच्या वस्तूवर अवलंबून न ठेवण्याचा अभ्यास करावा. बाहेरची वस्तू सुटली तरी मनाला दुसरी वस्तू देणे अवश्य असते. अशी वस्तू म्हणजे भगवंत होय. भगवंत हा नेहमी राहणारा, स्वयंपूर्ण, आणि आनंदमय असल्यामुळे त्याचे चिंतन करता करता मनामध्ये ते गुण उतरतात. अर्थात् मन भगवंताच्या चिंतनाने आनंदमय बनल्यावर त्या माणसाला जीवन किती रसमय होत असेल याची कल्पना करावी. मी त्याचा आहे आणि हे सर्व त्याचे आहे अशी सारखी जाणीव पाहिजे. किती आनंद आहे त्यात !

**बोधवचन : शुद्ध अंतःकरण ठेवून नाम घेतले तर भगवंताच्या कृपेचा अनुभव येईल.श्रीराम समर्थ**

**- श्री सद्गुरु ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

# मनाचे श्लोक


आधुनिक केसरी

**धरीं रे मना संगती सज्जनाची।**
**जेणें वृत्ति हे पालटे दुर्जनाची।**
**बळे भाव सद्बुध्दि सन्मार्ग लागे।**
**महा क्रूर तो काळ विक्राळ भंगे।।१३५।।**

श्लोकार्थ : चांगल्या लोकांची संगत धरली तर आपल्यात नकळत फरक पडतो. वाईट लोक सुध्दा चांगले होतात. सत्संगतीमुळे योग्य मार्ग मिळतो आणि काळाची भीती देखिल राहात नाही.

विवेचन : मागील दोन्ही श्लोकांत हरिभक्ताची अंतर्बाह्य स्थिती कशी असते, याचे वर्णन केले आहे. या श्लोकात सज्जन संगतीचे फळ सांगितले आहे.

श्री व्यंकटेश स्तोत्रात एक ओवी आहे. "गावीचे होते लेंडवोहोळ, गंगेसी मिळता गंगाजळ, काग विष्ठेचे झाले पिंपळ तयासी निंद्य कोण म्हणे ?" याचा सरळ अर्थ असा आहे की ज्याला संतसंगती/सज्जनसंगतीचा लाभ होतो, त्याचे जीवन गंगेप्रमाणे पवित्र बनते. आज संत सज्जनांची भेट होणे कठीण, भेट झालीच तर विश्वास बसणे कठीण. त्यावर विश्वास बसला तरी त्यांनी सांगितलेले साधन आपल्या हातून घडणे कठीण.... म्हणून यावर विचार करण्यात फार वेळ न घालवता ज्ञानेश्वर माऊली, जगद्गुरु तुकाराम महाराज, समर्थ रामदास आदी संतांनी सांगितलेला अखंड नामस्मरणाचा मार्ग आचरण्यास सुरुवात करावी. एकेक पाऊल चालल्याने यात्रा घडते, तद्वतच अखंड नामस्मरण करीत गेल्यास संतसंगतीचा लाभ विनासायास होऊ शकेल. साधकांचे नामस्मरण



वाढत गेले तर नाम घेणारा आणि ज्याचे नाम घेतो तो भगवंत यांच्यात एक सुंदर नात तयार होते. जसा मी खरा आहे तसा भगवंत ही खरा आहे, याची अनुभूती त्यास येऊ लागते. देव असल्याची जाणीव दृढ़ झाल्यामुळे साधक निर्भय होतो.

"एके भावनेसाठीं । देवासि पडे तुटी । कां ते होय कृपादृष्टी । देव कर्ताभावितां ॥" ( दा. ०६.७.३७ )

संतसंगतीमुळे श्रद्धा दृढ होत जाते. सद्भाव वाढू लागतो. सद्भाव वाढू लागल्याने 'मी कर्ता' ही भावना लोप पावू लागते आणि 'देवकर्ता' ही भावना दृढ होऊ लागते. स्वाभाविक देवाची त्याचावर कृपादृष्टी होते. देवाच्या कृपेने मनुष्य पूर्णपणे निर्भय होतो. मग त्याला कळीकाळाचेही भय रहात नाही. साधकाच्या या स्थितीचे संत तुकाराम महाराज पुढील प्रमाणे करतात.

पुण्य फ़ळलें बहुतां दिवसां । भाग्य उदयाचा ठसा ।
झालों सन्मुख तो कैसा । सन्तचरण पावलों ॥१॥
आजि फ़िटलें माझे कोडें । भवदुःखाचें सांकडे ।
कोंदाटले पुढें । परब्रम्ह सांवळें ॥२॥
आलिंगने संताचिया । दिव्य झाली माझी काया ।
मस्तक हें पायां । वरी त्यांच्या ठेवितां ॥३॥
तुका म्हणे धन्य झालो । सुखें संतांचिया धालों ।
लोटांगणीं आलों । पुढें भार देखोनी ॥४॥"

(अभंग क्र. 3204, श्रीतुकाराम गाथा, धार्मिक प्रकाशन संस्था)

सज्जनांच्या सहवासात राहिल्याने मनुष्याची वृत्ती हळूहळू पालटून योग्य विचार करु लागते, भाव सात्विक होऊन बुद्धी शुद्ध आणि निर्मम, निर्मल होण्याकडे वाटचाल सुरू होते. कितीही दुर्जन व्यक्ती असली तरी सज्जनांच्या सहवासाने हळूहळू नक्की तिच्यात वृत्तीपालट होतोच होतो आणि योग्य मार्गावर ( सतमार्ग ) व्यक्तीची वाटचाल होण्यास सुरुवात होते आणि भाव पालटले गेल्याने, मन स्थिर होते, बुद्धी नीट योग्य विचार करु लागते यासर्वांचा परिणाम म्हणजे कठीण काळ आला तरी व्यक्ती न डगमगता धीराने तोंड देऊ शकते, सक्षम होते. मृत्यूचे भय कमी होते. सत्संगतीने निर्भयता प्राप्त होते आणि अक्राळ विक्राळ असलेल्या यमाचे अर्थात मृत्यूचे भय कमी होते.

दास चैतन्य
संपर्क : 8380019676

# जूनपासून बल्लारपूर येथे एसएनडीटी विद्यापीठाचे केंद्र

## सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांना यश

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महिलांना शैक्षणिक आणि आर्थिकदृष्टया सक्षम करण्यासाठी एसएनडीटी विद्यापीठाचा वाटा मोठा आहे. शंभर वर्षांहून अधिक काळ झालेल्या एसएनडीटी विद्यापीठाचे केंद्र येत्या जूनपासून चंद्रपूर जिल्हयातील बल्लारपूर येथे सुरु करण्यात येणार आहे. सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी याविषयी सातत्याने पाठपुरावा केला होता. येणाऱ्या शैक्षणिक वर्षांपासून येथे रोजगारभिमुख आणि कौशल्यआधारीत अभ्यासक्रम सुरु करण्याला प्राधान्य देण्यात येणार असल्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले. पाटील यांच्या निवासस्थानी मंगळवारी यासंदर्भात बैठक झाली व निर्णय घेण्यात आला.

एस.एन.डी.टी.अर्थात श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाचे केंद्र चंद्रपूर



जिल्हयातील बल्लारपूर येथे सुरु करण्यासंदर्भात सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार आणि उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आज आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला चंद्रपूर जिल्हयाचे जिल्हाधिकारी विनय गौडा, एसएनडीटी विद्यापीठाच्या कुलगुरु प्रा. उज्जवला चक्रदेव, उच्च व तंत्रशिक्षण संचालक धनराज माने यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

मुनगंटीवार म्हणाले की, एसएनडीटी विद्यापीठाचा आतापर्यंत 7 राज्यांमध्ये विस्तार झालेला आहे. वेगवेगळे शैक्षणिक, रोजगारभिमुख आणि कौशल्यआधारीत अभ्यासक्रमांना आजही मागणी आहे. त्यामुळे चंद्रपूर आणि येथील परिसरातील विद्यार्थीनींना आवश्यक असणारे साधारण 10 अभ्यासक्रम या विद्यापीठातून शिकविण्यात येतील. एसएनडीटी विद्यापीठाचे बल्लारपूर येथे केंद्र सुरु करण्यासाठी आवश्यक असणारी जागेची पाहणी, साधनसामुग्री तसेच केंद्र सुरु झाल्यानंतर आवश्यक असणारे मनुष्यबळ, प्रशिक्षित प्राध्यापक याबाबतचा आढावा प्रत्यक्ष घेण्यात येईल. शैक्षणिक वर्ष जूनपासून सुरु होत असल्याने प्राथमिक टप्प्यात चंद्रपूर येथे असलेल्या अत्याधुनिक दोन शाळांमध्ये अभ्यासक्रम सुरु करण्यात येतील. देशाच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आणि एसएनडीटी विद्यापीठाने पार केलेली शताब्दी याचा मेळ घालून काही नवीन उपक्रमही विद्यापीठामार्फत सुरु करण्यावर भर देण्यात येईल असेही मुनगंटीवार यावेळी म्हणाले. पाटील म्हणाले की, चंद्रपूर येथील बल्लारपूर येथे एसएनडीटी केंद्र सुरु करण्यासाठी आवश्यक असणारा निधी याबाबतचा सविस्तर प्रस्ताव करण्यात यावा. तसेच सध्या पहिल्या टप्प्यात आवश्यक असणारा निधी सामाजिक उत्तरदायित्व निधी, डीपीडीसी याव्यतिरिक्त कसा उभा करता येईल याबाबतही सविस्तर प्रस्ताव उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे तातडीने सादर करण्यात यावा.आवश्यक पदभरती होईपर्यंत करार पध्दतीवर नेमणूका करुन काम सुरु करण्यात यावे. स्थानिक रहिवाशांना भरतीमध्ये प्राधान्य देण्यात यावे. एसएनडीटी विद्यापीठाने महिलांना सक्षम करण्यात महत्वाची भूमिका केली असून दुर्गम भागातील हे केंद्र महिलांना आर्थिकदृष्टया आणि शैक्षणिकदृष्टया सक्षम करण्यासाठी महत्वाचे ठरेल असा विश्वास पाटील यांनी व्यक्त केला.



अजिंठा दौऱ्यावर असताना महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री नामदार अब्दुल सत्तार साहेबांचा सत्कार करताना सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार संदीप मानकर, समाजसेवक साहेबराव दणके, समाधान लोखंडे, श्रीकांत मानकर आदी.

# महाराष्ट्र रत्न पुरस्काराने मोहम्मद रिजवान जड्डा सन्मानीत

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** महाराष्ट्र रत्न सन्मान सोहळा मुंबई येथे रविवार दिनांक 30 ऑक्टोबर 2022 रोजी संपन्न झाला. आंतरराष्ट्रीय मानव अधिकार राजदूत संघटना, पोलीस मित्र माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण सेना, ऑल इंडिया अँटीकरप्शन पार्लमेंट कमिटी, भारतीय महाक्रांती सेना व अखिल भारतीय पत्रकार हक्क संसद समितीच्या संयुक्त विद्यमानाने महाराष्ट्र गौरव राज्यस्तरीय सन्मान सोहळा-2022 चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंचावर टी एल विजया लक्ष्मी (बॉलिवूड अभिनेत्री), मुनी शाम प्रभु विजय, कांचन अवस्थी (बॉलीवूड अभिनेत्री),राज दमरे (मोडलींग, अभिनेता), अविनाश सकांडू (राष्ट्रीय अध्यक्ष) सह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. या अंतर्गत मोहम्मद रिजवान जड्डा, लोणार यांची उल्लेखनीय सामाजिक कामगिरीची दखल घेऊन महाराष्ट्र रत्न -2022 या पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले. सदर पुरस्कार सन्मान सोहळ्या मध्ये मुंबई



येथे त्यांच्या सोबत त्यांचे लोणार येथील जिवलग मित्र वसिफ खान मनसबखान, शेख इक्बाल शेख तुराब, रिजवान खान करामत खान, मतीन खान सोबतच इतर शहरातून सामाजिक, राजकीय मंडळी, जमियते उलेमाचे पदाधिकारी, वकील मित्र मंडळाचे अनेक सदस्य व कॉलेज जीवनातील मित्र मंडळींची विशेष उपस्थिती होती. पुरस्कारांच्या माध्यमातून चांगले काम करणाऱ्या व्यक्तींचा गौरव होतो. कोणीही चांगले काम केले की, अश्या व्यक्तीला एखाद्या संस्थेकडून पारितोषिक, पदक, चषक, ढाल, मानपत्र, ताम्रपट, हारतुरे, श्रीफल, शाल, स्मृतिचिन्ह किंवा रोख रकमेच्या रूपात सन्मानित केले जाते. ज्ञान, साहित्य, कला, समाजकार्य आदि विविध क्षेत्रांमध्ये उत्तम काम करणाऱ्या व्यक्तीला अनेक संस्था पुरस्कार देतात. यंदाचा महाराष्ट्र रतन पुरस्कार रिजवान जड्डा यांच्या माध्यमातून लोणारच्या वाटेवर आल्याने सर्वत्र रिजवान जड्डा यांचे कौतुक करून त्याच्यावर शुभेच्छांचा वर्षाव करण्यात येत आहे व मित्र परिवारामध्ये मोठे जल्लोष साजरे करण्यात येत आहे.

# बँक कर्मचाऱ्यांचा 19 नोव्हेंबर रोजी संप

आधुनिक केसरी न्यूज

**कर्मचारी संघटनांवर हल्ले :** बँक कर्मचारी संघटना, एआयबीईए सातत्याने सरकारच्या चुकीच्या धोरणांना विरोध करत आली आहे . ही बाब सरकारला खुपत असून त्यांच्याकडून संघटनेवर सुनियोजित हल्ला सुरू असल्याचा आरोप कर्मचारी संघटनेने केली आहे . विविध बँकातून, बँक व्यवस्थापन कामगार कायद्यातील तरतुदी धाब्यावर बसवत आहे, तरतुदींचे उल्लंघन करत आहे, कर्मचाऱ्यांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण करत असून, संघटनांचा आवाज दडपण्याचे प्रयत्न होत असल्याचा आरोप कर्मचारी संघटनांनी केला आहे .

**मुंबई :** बँक व्यवस्थापनाकडून कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर होणाऱ्या दुर्लक्षाविरोधात बँक कर्मचाऱ्यांनी देशव्यापी संपाची हाक दिली आहे. बँक कर्मचाऱ्यांनी 19 नोव्हेंबर रोजी देशव्यापी संपाची हाक दिली आहे. देशभरातील तीन लाख कर्मचारी या एक दिवसाच्या लाक्षणिक संपावर जात आहेत. ऑल इंडिया बँक एम्प्लॉईज असोसिएशनच्या नेतृत्वाखाली या संपाची हाक देण्यात आली आहे. आतातपर्यंत बँक व्यवस्थापनाकडून कर्मचारी संघटनांसोबत द्विपक्षीय चर्चा करून निर्णय घेतले जात होते. मात्र, चर्चेच्या या पद्धतीला छेद देत व्यवस्थापनाकडून एकतर्फी निर्णय घेतले जात असल्याचे कर्मचारी संघटनांनी म्हटले आहे. द्विपक्ष करारातील तरतूदीना धाब्यावर बसवून मनमानीपणे बँक व्यवस्थापन निर्णय घेत आहेत. त्या व्यवस्थापनाच्या धोरणांच्या विरोधात संप पुकारण्यात आला असल्याची माहिती बँक कर्मचाऱ्यांचे नेते देविदास तुळजापूरकर यांनी दिली. बँक ऑफ बडोदा, बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र, कॅनरा बँक, फेडरल बँक, सेंट्रल बँक, कॅथॉलीक सीरीयन बँक आदी बँकामधील औद्योगिक संबंध सध्या अनेक बँकनिहाय प्रश्नांवरून तणावपूर्ण झाले आहेत हे लक्षात घेता एआयबीईएने या संपाची हाक दिली आहे. आधीच अपुरा कर्मचारी वर्ग, कामाचा वाढता बोजा यामुळे कर्मचारी वर्ग तणावाखाली काम करत आहेत. त्यातच व्यवस्थापनांच्या या मनमानी धोरणांमुळे कर्मचारी उद्विग्न झाले आहेत. त्यांच्यात वैफल्यतेची भावना निर्माण झाली आहे. बँकनिहाय संघटनांनी हे प्रश्न आपापल्या व्यवस्थापनाकडे उपस्थित करून वाटाघाटीद्वारे सोडवण्याचे प्रयत्न केले. पण ते अयशस्वी ठरले. त्यामुळे नाईलाजाने शेवटी संघटनेला उद्योग पातळीवर संपाची हाक द्यावी लागत असल्याचे कर्मचाऱ्यांचे नेते नंदकुमार चव्हाण यांनी सांगितले. बँक कर्मचारी संघटना म्हणून आम्ही निश्चलनीकरण (नोटाबंदी), जीएसटी, जीवन ज्योती, जीवन सुरक्षा, अटल पेन्शन, मुद्रा, स्वनीधी या सारख्या सरकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करत सरकारला मोठ्या प्रमाणावर सहकार्य केले आहे.

# खारघरच्या डोंगरांमध्ये वाघाचा वावर

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** खारघरच्या डोंगरांमध्ये वाघाचा वावर असल्याने येथील आदिवासी वाड्यांवरील लोकवस्ती धास्तावली आहे. गेल्या महिन्याभरात वाघाचा तीन वेळा वावर दिसला आहे. पहिल्या दोन घटनांमध्ये टाटा पावर कंपनीचे कर्मचा-यांना या परिसरात वाघ दिसला. तसेच दोन आठवड्यापूर्वी बेलापूरकडून खारघर हिलवरील चाफेवाडी आदिवासी वाडीकडे जाण्याच्या रस्त्यावर बोगद्याजवळ पारधी कुटूंबीयांनी हाकेच्या अंतरावरुन वाघाला पाहिले. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. रिक्षातून किरण पारधी यांचे कुटूंब चाफेवाडीकडे त्यांच्या घरी जात होते. त्यावेळेस वाघ एका बैलाच्या मागे गेल्याचे पारधी कुटूंबीयांनी पाहीले. रिक्षाच्या मागून त्यावेळेस दुचाकीवर किरण हे येत होते. वाघाला पाहील्यानंतर रिक्षातील सर्वेच घाबरले. किरण यांच्या रिक्षाचालक मुलाने पहिली बातमी वडिलांना सांगून त्यांना खबरदार केले. मात्र किरण यांनी रिक्षातील सर्वांना धीर दिला. वाघ बैलाच्या मागावर असल्याने चिंता न करता रिक्षा व्यवस्थित घरच्यादिशेने घेऊन जाण्याचा सल्ला वडील किरण यांनी मुलगा, पत्नी व मेव्हणीला दिला. अखेर कसे बसे पारधी कुटूंबीय वाघाच्या भीतीने घरी चाफेवाडीकडे परतले.

# सत्ता गमावल्याचा सूड घेण्यासाठी महाराष्ट्राचा विकास रोखण्याचे कारस्थान

## भाजप प्रदेश सरचिटणीस संजय केणेकर यांचे ठाकरे कुटुंबावर थेट शरसंधान

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** अडीच वर्षांच्या महाविकास आघाडी सरकारच्या काळात सर्वच आघाड्यांवर आलेले अपयश लपविण्यासाठी आकांडतांडव करून त्याचे खापर शिंदे-फडणवीस सरकारवर फोडण्याचा ठाकरे पितापुत्रांचा प्रयत्न हा महाराष्ट्रातील गुंतवणूक रोखण्याचा आणि नव्या गुंतवणूकदारांमध्ये महाराष्ट्राविषयी संभ्रम निर्माण करण्याचा पद्धतशीर प्रयत्न आहे, असा थेट आरोप आज भाजपचे प्रदेश सरचिटणिस संजय केणेकर यांनी केला आहे. वेदान्त फॉक्सकॉन प्रकल्प महाराष्ट्राबाहेर गेल्याचे ठाकरे सरकारचे अपयश उघडकीस येऊ नये या साठी उलटा कांगावा करण्याचा प्रयत्न पुरता फसल्यानंतर आता महाराष्ट्राशी कोणताच संबंध नसलेल्या उद्योगांची खोटी यादी पुढे करून जनतेच्या मनात संशय निर्माण करण्याचे उद्योग ठाकरे पितापुत्रांनी सुरू केले आहेत. प्रत्यक्षात ज्या उद्योगांशी महाविकास आघाडी सरकारच्या काळात ठाकरे यांनी साधी चर्चादेखील केली नव्हती, सामंजस्य करारही झाला नव्हता, किंवा सरकारमार्फत कोणताही पत्रव्यवहारदेखील झाला नव्हता, अशा उद्योगांची खोटी यादी पुढे करून एक अपप्रचाराचे टुलकिट तयार करण्याचा या पितापुत्रांचा प्रयत्न महाराष्ट्राच्या भविष्यातील प्रगतीस आणि उद्योगस्नेही वातावरणास अडसर निर्माण करणाराच आहे असा गंभीर आरोपही श्री.संजय केणेकर यांनी केला. अविश्वासाने आणि जनादेश लाथाडून अभद्र आघाडीद्वारे गैरमार्गाने मिळविलेली सत्ता अडीच वर्षांत गमावल्याच्या संतापातून ठाकरे पितापुत्रांचा हा थयथयाट सुरू असून, याचा सूड महाराष्ट्रावर उगवण्या साठी राज्यातील गुंतवणुकीत अडसर उभे करण्याचा भयंकर कट रचला जात आहे, असा संशय त्यांनी व्यक्त केला. महाराष्ट्राची जनता सुज्ञ आहे. कोविडकाळात ठाकरे सरकारच्या भ्रष्ट कारभाराचे अनेक नमुने जनतेने प्रत्यक्ष अनुभवले आहेत. जुलमी, एककल्ली, हेकेखोर, आणि कायदा गुंडाळून ठेवत जनतेला वाऱ्यावर सोडणाऱ्या आघाडी सरकारने अडीच वर्षांच्या सत्ताकाळात महाराष्ट्राला दहा वर्षे मागे नेऊन काँग्रेसी राजवटीत नेले. मात्र, आता अशा कटकारस्थानांना केराची टोपली दाखवून राज्याला वेठीस धरणाऱ्यांना जनता जागा दाखवून देईल असा इशाराही त्यांनी दिला. ठाकरे सरकारशी संबंधित असलेल्यांच्या भ्रष्टाचाराचे नमुने आता उजेडात येऊ लागले आहेत. भ्रष्टाचाराच्या आणि देशद्रोह्यांना साह्य केल्याच्या आरोपाखाली तुरुंगाची हवा खावी लागलेल्या नेत्यांच्या पावलावर पाऊल टाकून आणखी काही बोलभांड नेत्यांना गजाआड जाण्याच्या भीतीने घाम फुटला असून त्या भीतीपोटीच हे आकांडतांडव सुरू आहे,असा टोलाही त्यांनी मारला.

# बच्चू कडूंची टोलेबाजी

आधुनिक केसरी

बडनेराचे आमदार रवी राणा आणि अचलपूरचे आमदार बच्चू कडू यांच्यात मागील काही दिवसांपासून संघर्ष सुरू होता. याप्रकरणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मध्यस्थी केल्यानंतर या वादावर पडदा पडला आहे. दरम्यान, आज बच्चू कडूंनी अमरावती येथे शक्तीप्रदर्शन करत जोरदार टोलेबाजी केली आहे. गुवाहाटाली गेलेल्या आमदारांवर केल्या जाणाऱ्या टीकेलाही आमदार कडूंनी प्रत्युत्तर दिले आहे. राजकारण हे राजकारणासारखे करावे लागेल आणि तत्त्व हे तत्त्वांसारखी पाळावी लागतील. या दोन्ही गोष्टींची सांगड घालावी लागेल. केवळ तत्त्व पाळत राहिलो आणि काम काहीच केले नाही, तर त्या तत्त्वांना किंमत उरत नाही. लोकांच्या दुःखावर कुठेतरी मलमपट्टी करता आली पाहिजे. आम्ही उगीच गुवाहाटीला गेलो नाही. तेव्हा मी राज्यमंत्री होतो. मंत्री असतानाही मला गुवाहाटीला जाण्याची गरज काय होती. मी ज्या शेवटच्या घटकासाठी उभा राहिलो, तो घटक महत्त्वाचा आहे असे बच्चू कडू आपल्या भाषणात म्हणाले. पुढे बच्चू कडू आपल्या भाषणात म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९३८ मध्ये कॉंग्रेसला 'जळते घर' म्हटले होते. काँग्रेसशी मैत्री म्हणजे 'मुंगूस आणि सापाची' मैत्री असंही ते म्हणाले होते. तरीही बाबासाहेबांची तत्त्व महत्त्वाची होती. राजकारणात आलटापालट होऊ शकते. पण मी ज्या शेवटच्या घटकासाठी उभे राहिलो तो घटक महत्त्वाचा आहे. त्याचे खरे स्वातंत्र महत्त्वाचे आहे. ही सगळी सत्ता त्या वंचितांपर्यंत नेण्याचे काम महत्त्वाचे आहे. त्यामुळे ज्यांना 'जळते घर' म्हटले त्यांच्यासोबतच बाबासाहेब बसले आणि संविधान समितीचे सदस्य झाले. यानंतर त्यांनी घटना तुमच्या हाती दिली. निर्णय कडू असले तरी काम गोड करता आले पाहिजे. शिवाजी महाराजांनी तर कित्येकदा तह केले. माझ्या शेतकऱ्यांच्या पिकाच्या देठालाही हात लागता कामा नये, या भावनेतून जेव्हा छत्रपतींनी म्यानातून तलवार बाहेर काढली, तेव्हा त्यांनी तत्त्वांशी कुठेही तडजोड केली नाही. कधी आदिलशहा तर कधी मुघलांनासोबत घेऊन महत्त्वाचे ध्येय साध्य केले. याला तुम्ही बंडखोरी म्हणता का? हा उठाव आहे. शरद पवारांनी २०१४ मध्ये भाजपाला बिनशर्त पाठिंबा दिला. तो त्यांच्यासाठी सोयीचा होता. पण तेव्हा कुणीही बोलले नाही. गरिबाच्या पोरीने प्रेम केले तर ती पळाली आणि श्रीमंताच्या पोरीने प्रेम केले तर त्यांचे 'लव्ह मॅरेज'... आमचाही उठाव होता, हम छोटे हैं लेकीन दिलदार है" अशा शब्दांत बच्चू कडूंनी टोलेबाजी केली आहे.

# उच्च शिक्षण, संशोधन काही प्रश्न काही उत्तरे

आधुनिक केसरी



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

**देशाला स्वातंत्र्य मिळून आता ७५ वर्षे होताहेत. या दरम्यान अनेक शैक्षणिक सुधारणा झाल्या. प्रयोग झालेत. आयोग आलेत. अहवाल आलेत. नवीन धोरणे आली. आता तर या सरकारने २०२० पासून पूर्णतः नवे शैक्षणिक धोरण आणले. या पार्श्वभूमीवर गुणवत्ता किती कशी वाढली हे तपासणे गरजेचे आहे. संख्या वाढ निश्चितच झाली.शाळा, कॉलेजेस, इंजिनियरिंग, मेडिकलची प्रवेश संख्या, खाजगी कॉलेजेस, स्वायत्त विद्यापीठे यांची संख्या भरपूर वाढली. पण ते व्यापारीकरण झाले. प्रत्येक आमदार, खासदार, मंत्री यांनी आधी साखर कारखाने अन् नंतर शिक्षणसंस्था काढून समाजाला अक्षरशः लुटले! सरकारला लुबाडले, फसवले. जमिनी लाटल्या. प्राध्यापकाच्या नेमणुकीतून भ्रष्टाचार केला. गुणवत्तेकडे पार दुर्लक्ष केले. हे कटू सत्य, उघडे गुपित आहे!**

गेले दोन अडीच महिने माझे मुलाकडे नेदरलँड येथे वास्तव्य होते. या काळात एकूणच युरोपियन, पाश्चात्य शिक्षण पद्धतीचा अभ्यास केला. चर्चेतून त्याच्या व्यवस्थेचे वेगळेपण जाणून घेतले. माझा मुलगा आशिष याला अमेरिकेतील अनेक विद्यापीठाचा अनुभव आहे, माहिती आहे. शिवाय श्यानान ल्याब, सॅमसंग, फिलिप्स रिसर्च, एनपीएक्स सेमी कंडक्टर अशा संशोधन संस्थेत त्याने काम केले आहे. त्याच्या नावावर १०० पेक्षा जास्त पेटंट आहेत. सिंगापूर विद्यापीठ, आयआयएससी, बंगलोर, टेक युनिव्हर्सिटी इंधोवण येथे अतिथी प्राध्यापक, मानद संशोधक म्हणून त्याने काम केले आहे.जगातील सर्वश्रेष्ठ संशोधकाच्या टॉप १ परसेंट यादीत त्याला नामांकन मिळाले आहे. तेही विविध जर्नल्समधून प्रकाशित दर्जेदार, गुणवत्तेवर आधारित रिसर्च पेपर्सच्या भरवशावर. हे सारे सांगण्याचा उद्देश हा की, प्रस्तुत लेख ज्या चर्चेवर आधारित आहे, त्या मागची तात्विक, बोदधिक बैठक ध्यानात यावी. या चर्चेत मुलाबरोबर त्याची तिकडेच शिकलेली, सध्या शिकवीत असलेली सूनदेखील सहभागी होती. त्याच्यासमोर चर्चेसाठी ठेवलेले प्रश्न असे :-

१ भारतातील संशोधन पद्धत अन् परदेशातील अप्रोच यात नेमका फरक काय?
२ भारत मूलभूत गुणवत्ता पूर्ण संशोधनात मागे का?
३ आपली शिक्षण पद्धती कुठे कमी पडते?
४ आपली युवा पिढी भारतात न राहता बाहेर जातात,परदेशी नाव कमावतात,असे का?
५ आपल्या विद्यापीठात दर्जेदार संशोधन का होत नाही?
६ आयटी सेक्टर, एमएनसी इकडेच तरुणाचा ओढा का? आपल्याकडे उद्योग, उद्योजक त्या प्रमाणात का नाहीत?
७ आपल्या शिक्षण पद्धतीत काय उणीवा आहेत?

या मूळ प्रश्नाच्या अवतीभोवती रंगलेल्या चर्चेचे, सुसंवादाचे फलित म्हणजे प्रस्तुत लेख.

देशाला स्वातंत्र्य मिळून आता ७५ वर्षे होताहेत. या दरम्यान अनेक शैक्षणिक सुधारणा झाल्या. प्रयोग झालेत. आयोग आलेत. अहवाल आलेत. नवीन धोरणे आली. आता तर या सरकारने २०२० पासून पूर्णतः नवे शैक्षणिक धोरण आणले. या पार्श्वभूमीवर गुणवत्ता किती कशी वाढली हे तपासणे गरजेचे आहे. संख्या वाढ निश्चितच झाली.शाळा, कॉलेजेस, इंजिनियरिंग, मेडिकलची प्रवेश संख्या, खाजगी कॉलेजेस, स्वायत्त विद्यापीठे यांची संख्या भरपूर वाढली. पण ते व्यापारीकरण झाले. प्रत्येक आमदार, खासदार, मंत्री यांनी आधी साखर कारखाने अन् नंतर शिक्षणसंस्था काढून समाजाला अक्षरशः लुटले! सरकारला लुबाडले, फसवले. जमिनी लाटल्या. प्राध्यापकाच्या नेमणुकीतून भ्रष्टाचार केला. गुणवत्तेकडे पार दुर्लक्ष केले. हे कटू सत्य, उघडे गुपित आहे! शिक्षक, प्राध्यापक या पदाला जी गुणवत्ता लागते, जे प्याशन हवे असते, जी भावनिक गुंतवणूक हवी असते त्या दर्जाचे उमेदवार मिळतच नाहीत. दुसरी चांगली नोकरी मिळाली नाही म्हणून लास्ट चॉईस, शेवटचा पर्याय म्हणून या क्षेत्रात येणारेच जास्त. त्याचाही परिणाम विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर होतो. मुख्य म्हणजे शिक्षणाचे मूळ उद्दिष्टच समजून घेतले जात नाही. शिक्षण हे पदवी सर्टिफिकेट घेण्यासाठी अन् पर्यायाने नोकरीसाठी गरजेचे म्हणून घेतले जाते. ज्ञान मिळविण्यासाठी शिक्षण हे मूळ उद्दिष्ट बाजूला राहते. त्यामुळे शिकवणारे, शिकणारे या सर्वांची दिशाभूल होते. सगळे लक्ष मार्क्स, श्रेणी, परसेंटेज याकडेच लागलेले. परीक्षाचे नियोजन देखील त्याच उद्दिष्टाने केलेले. कोणतीही परीक्षा विद्यार्थी काय, कसे शिकला हे तपासत नाही. जे शिकवले, जेव्हढे शिकवले ते जसेच्या तसे शिकला की नाही यावर, पाठांतरावर भर. एकाच प्रश्नांची वेगळी उत्तरे शोधण्याचा प्रयत्नच नाही. ठराविक प्रश्न, त्यांची ठराविक उत्तरे, ठराविक वेळात सांगितली तशीच लिहिणे म्हणजे आपली परीक्षा. त्यात कल्पना शक्तीला वाव नाही. वेगळ्या विचाराला स्थान नाही. एकाच प्रवासाचे अनेक पर्याय असू शकतात. जो साधा, सोपा पर्याय वाटतो तो उत्तम पर्याय नसतो हा विचारच नाही. सगळे ठोकळे बाज विशिष्ट साच्यातले विचार. त्यामुळे नाविन्याला जागाच नाही कुठे. म्हणूनच आपल्याच परीक्षावर आपलाच विश्वास नसतो! प्रत्येक ठिकाणी पुन्हा परीक्षा, पुन्हा चाचणी. आता तर करोनाचे निमित्त साधून त्या काळात गुण उधळण्याची स्पर्धाच चालली होती. अनेकांना ९० टक्के गुण मिळाले बोर्डात. पण प्रत्यक्षात ही गुणाची टक्केवारी अन् मुलाचे ज्ञान, आकलन याचा अर्था अर्थी काही संबंध नसतो.



डॉ. आशिष पांढरीपांडे

आपले शिक्षण, अध्यापन आपली परीक्षा, मूल्य मापन हे सारे पदवी प्रमाणपत्रा पुरते मर्यादित आहे. आपण शाळा कॉलेजात नेमके काय शिकलो, कोण कोणते कौशल्य आत्मसात केले, आपण कसे घडलो, आपण काय करू शकतो याला काही महत्व नाही. म्हणजे शिक्षणाचे खरे उद्दिष्ट राहते बाजूला. अन् विद्यार्थी फिरतात ते वेगळ्याच रिंगणात! आपल्यासमोर असते ते लठ्ठ पगाराच्या सरकारी नोकरी चे स्वप्न. आपल्याला सारे इन्स्टंट हवे असते.डायरेक्ट शिखरावर चढायचे असते. त्यासाठी आधी अनेक पायऱ्या चढाव्या लागतात, घाम गाळावा लागतो, हे आपण विसरतो. यासाठी जॉब अन् पदवी हे डी लिंक केले पाहिजे. आज किंवा उद्या जे जॉब उपलब्ध आहेत त्यासाठी तुमची पदवी, तुमची श्रेणी, टक्केवारी हे महत्वाचे नसते. तुमचे कौशल्य, तुमची भाषा, संवाद कौशल्य, तुमचा स्वभाव, तुमची मिळून मिसळून काम करण्याची तयारी, नवनवीन ज्ञान संपादन करण्यासाठी सातत्याने शिकण्याची जिद्द हे सारे महत्वाचे असते. तुमची नीतीमत्ता महत्त्वाची असते. आपले शिक्षण याकडे फारसे लक्ष देत नाही. आपले शिक्षण हे ठराविक सिल्याबस, अभ्यासक्रम या भोवतीच फिरते.

परदेशातील मुलांना आधी स्वतःच्या पायावर उभे राहावे लागते. तिथे कसलेही स्पून फिडिंग नसते हे महत्वाचे. मुख्य म्हणजे शिकवण्यापेक्षा शिकण्यावर जास्त भर. आपल्याकडे शिक्षक विद्यार्थ्यांच्या डोक्यात किती कोंबु हाच विचार करतो. त्यामुळे मुलाचा गोंधळ उडतो. एक धड ना भराभर चिंध्या अशी स्थिती होते.

मूल्यमापन सातत्याने व्हावे. तेही परीक्षेचे टेन्शन वाटू न देता. नव्या शैक्षणिक धोरणात यावर बऱ्याच चांगल्या सूचना, कल्पना आहेत. पण आपली धोरणे, अहवाल हे फायलीतच कपाट बंद राहतात.अंमलबजावणी नीट होत नाही. प्रत्यक्ष कृतीत काही उतरत नाही. कारण आळस. नव्या बदलाला विरोध. आपल्याला CHANGE FOR BETTER म्हंटले की ही काय नवी कटकट हीच प्रतिक्रिया. जग वेगाने पुढे चालले आहे. नवे नवे तंत्रज्ञान येते आहे. त्याकडे अशी पाठ फिरवून चालणार नाही.अभ्यासक्रम सातत्याने बदलायला हवेत. परीक्षा पद्धतीत बदल करायला हवे. मूल्यमापन कठोर, सापेक्ष, सच्चे हवे. त्यात संदिग्ध ता नको. संशयाला जागा नको. लाड नको. कसलाही दबाव नको.

आपले विद्यापीठातील संशोधन हाच खरा संशोधनाचा विषय! त्यात कट पेस्ट, उचलेगिरी जास्त. नवा विचार, नवी संकलपना, नवे प्रयोग, नवी दिशा हे अपेक्षित काहीच नसते. रिसर्च पेपर्स प्रकाशन हा देखील बाजार झालाय. कुणीही कुठेही खेड्यापाड्यात आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करतो! तिथे सुमार निबंधाचे वाचन, प्रकाशन होते. ते संशोधन म्हणून गणले जाते! सगळाच विनोद! यातही आर्थिक व्यवहार. त्यात मार्गदर्शक, परीक्षक सारे हातात हात घालून सामील. याचे माध्यमावर स्टिंग ऑपरेशन प्रसिध्द होते. पण कुणाला कसली लाज वाटत नाही. या संशोधनात नावीन्य तर फारसे नसतेच. पण त्याचा समाजाच्या भल्यासाठी उपयोग काय हा आवश्यक विचार देखील नसतो. तुमच्या संशोधनाचा समाजाला काही उपयोग होणार नसेल तर ते फक्त ग्रंथालयाच्या कपाटात धूळ खात पडून राहणार.आपल्याकडे बहुतांशी तेच होते!

परदेशातील विद्यापीठातील संशोधन समाजाभिमुख तर असतेच. पण त्याचा उद्योग क्षेत्रांशी देखील संबंध असतो. विद्यापीठ, सरकारी संशोधन संस्था (उदा नासा), इंडस्ट्री यांच्यात तिकडे संशोधन करार (MOU) होतात. त्याद्वारे इंडस्ट्रीजकडून भरपूर ग्रांन्टस मिळतात. त्यातून अद्ययावत प्रयोगशाळा उभारता येतात. आपल्याकडे हे करार MOU, फक्त कागदोपत्री, फायलीपुरते मर्यादित असतात. सोशल कॉर्पोरेट रिस्पॉन्स च्या नावाखाली थोडी फार देवाण घेवाण होते. पण उद्योग क्षेत्र अन् विद्यापीठ यात परस्पर विश्वासाचे वातावरण नसते.

(उर्वरित भाग उद्याच्या अंकात)

# दृष्टी आणि सुईदोरा

आधुनिक केसरी



भानुदास धोत्रे
संपर्क क्र : 7972625086

**परवा घराच्या दरवाज्याला हार करायला म्हणून, सुई दोरा हातात घेतला. तसंही हार करण्यापलीकडे सुई दोऱ्याचं महत्व आता पूर्वीसारखं उरलं नाही. दोऱ्याचं एक टोक चांगलं बोटावर चोळून बारीक केलं. सुईमध्ये दोरा ओवण्याचा आटोकाट प्रयत्न करू लागलो. परंतु सुईतून दोरा आरपार जात नव्हता. म्हणून पुन्हा पुन्हा प्रयत्न करून पहिले. पण मेळ जमत नव्हता. कधी सुई अगदी डोळ्याजवळ घेऊन पहिली तर कधी थोडी डोळ्यापासून दूर नेऊन पहिली. पण दोरा काही सुईमध्ये जात नव्हता. काही क्षण दोरा सुईच्या टोकातून पार गेल्याचा भास व्हायचा पण नंतर कळायचं की हाही प्रयत्न फसलाच. बरेच प्रयत्न करून पाहिल्यावर कंटाळलो आणि मुलाला हाक दिली. हाकेसरशी तो आला. त्यानं सांगितल्याबरोबर चुटकीसरशी दोरा सुईच्या टोकात ओवला आणि फिदिफिदी हसू लागला. त्याला वाटलं एवढं सोप्प काम अन तेही पप्पाला जमलं नाही. हसत हसतच तो त्याच्या कामात गुंतून गेला.**

मन नकळत भूतकाळात रमून गेलं. बालपणीचे ते दिवस आठवले. माय पण असंच झडीपाण्याच्या दिवसात कामधंदा बंद असल्यामुळं, घरीच असायची. रिकामा वेळ कठत नाही म्हणून, जुनेरी कापडं घेऊन शिवायला बसायची. पार वळचणीला कापडाच्या गाठोड्यात बांधून ठेवलेले आंगरखे, चड्ड्या, झंपर, परकर, लुगडे, धोतर असं काहीबाही काढून अंगणात पसारा मांडायची. कोणती वस्तू कुठं फाटली हे आगोदर शोधून काढी. कोणत्या कापडाला केवळ टिपा द्यायच्यात. कोणत्याला दुसऱ्या कापडाचं चिरंगुट लावून ठिगळ द्यायचं, हे अगोदरच ठरवी. बुधवारच्या बाजारातून तिनं आठवणीनं एक दोऱ्याची मोठ्ठी रीळ आणून ठेवलेली असे. कपडांना ठिगळं लावून किंवा टाके मारून वापरणं ही त्यावेळची नित्याची गरज होती. त्यात शरम वाटण्यासारखं काही नसायचं.

शिवणकामाला सुरुवात करण्याआधी मोठ्ठी सुई हातात घ्यायची. जाडसर लांब दोरा घेऊन त्याच्या टोकाला थुंकी लावून दोन्ही बोटावर चोळायची. दोऱ्याला चांगलं लांब अनुकूचिदार टोक तयार झालं की सुईमध्ये दोरा ओवण्याचा प्रयत्न करायची. बरेच प्रयत्न करूनही जेंव्हा तिच्याकडून दोरा ओवल्या जायचा नाही. तेंव्हा मात्र ती मला हाक द्यायची. मी तिथंच आजूबाजूला खेळण्यात रमलेला असे. ऐकून न ऐकल्यासारखं करून पुन्हा खेळण्यात रमून जाई. तेंव्हा मात्र ती गोळ्या नाहीतर चॉकलेटचं आमिष मला द्यायची. एकदाचा एवढा दोरा सुईमध्ये ओवून दे म्हणून विनवणी करायची. तेंव्हा मी तीला म्हणत असे "तू काय आत्ताच आंधळी झालीस की काय?" त्यावर ती म्हणत असे "काय करावं बाळा, मपलं आता वय झालं. तसंच सतत चुलीपुढं राबू राबू डोळ्याचा पार बुकना वाजून गेलाय बघ. त्यामुळं मही नजर कमी झाली. तू काय चांगला तरणाबांड हायेस अजून. त्यामुळं तुला मांजरावानी टुकूमुकू दिसतंय." असं मायीनं म्हणताच मला मात्र खूप आनंद व्हायचा. क्षणाचीही उसंत न लागू देता एका झटक्यात सुईत दोरा ओवून तिच्या हवाली करीत असे. दिलेला रुपया-आठ आणे घेऊन पळत चॉकलेट गोळ्या खाण्यासाठी निळूकाकांच्या दुकानात जात असे.



झेंडूच्या फुलांचा हार ओवतांना सुईच्या टोकात दोरा ओवता आला नाही. म्हणून मला माझ्या मुलाची मदत घ्यावी लागली. म्हणजेच माझ्या बालपणी माय फाटकी कापडं शिवतांना माझी मदत घ्यायची अगदी तसंच. अरेच्या...!! म्हणजे आपण त्यावेळच्या मायीच्या वयाचे झालो म्हणा की! मग वयोमानाप्रमाणे दृष्टीही कमी होणारच. पण दिवसं किती भराभर निघून जातात. तरुण वयात लख्ख असणारी दृष्टी हळूहळू वाढत्या वयाप्रमाणे आपले रंग दाखवायला सुरुवात करते. नकळत आपण वयाच्या उत्तरार्धाकडे कलत जातो. पण आपण जगत आहोत तो वर्तमान विज्ञानाच्या उत्क्रांतीचा. दृष्टी कमी झाली की लगेच आपण डॉक्टरला दाखऊन, चांगल्या प्रतीचा चष्मा विकत घेऊन, त्यावर मात करू शकतो. परंतु मायीच्या काळाचा विचार करता ह्या गोष्टी दुरापास्तच होत्या. सोई साधनं उपलब्ध असूनही त्यांना तुटपुंज्या आर्थिक परिस्थितीमुळे हालाखीचे दिवस काढावे लागत. त्यामुळं आहे त्या परिस्थितीत दिवस निभून नेण्यावर त्यांचा जास्त भर असे. आपण मात्र चंगळवादी झालोत. कुठल्याही लहानमोठ्या शारीरिक व्याधीवर सहज उपाय करून त्यावर मात करतोत. पण पूर्वीची माणसं फार सोशिक होती. म्हणून जुनेऱ्या पानेऱ्या बरोबरच सुई आणि दोऱ्या सारख्या जुजबी वस्तुंना त्यांच्या लेखी खूप महत्व होतं. भलेही दृष्टी कमकुवत झाली तरी लहानांची मदत घेऊन ते त्यावर मात करीत असत.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



प्रा. प्रविण डिगांबर बोंद्रे
लाडेगाव, ता. अकोट, जि.अकोला

# बालकामगार : समस्या व समाधान

आधुनिक केसरी

**आपल्या देशात देवांच्या बालरूपाची अनेक मंदिरे आहेत .जसे बालगणेश, हनुमान, श्रीकृष्ण इत्यादी. आपल्या देशात मुलांना देवाघरची फुले असे म्हटले जाते. ध्रुवबाळ , भक्त प्रल्हाद, लवकुश ,अभिमन्यू यासारखे अनेक बालक भारतीय सांस्कृतिक होऊन गेलेत. परंतु आजच्या काळात भारतात गरिबीची स्थिती मोठ्या प्रमाणात आहे. देशातील गरीब मुलांची स्थिती चांगली नाही. बालकामगार व बालमजूरी आपल्या देशाची मोठी समस्या आहे. बालमजुरीमुळे गरीब मुलांचे भविष्य अंधकारमय होत आहे. 14 वर्षाच्या लहान मुलांद्वारे काम करून घेणे म्हणजेच बालमजुरी होय. कमी वयात काम करणाऱ्या या मुलांना बालकामगार म्हटलं जाते. कोणत्याही राष्ट्राच्या विकासासाठी तरुण व लहान मुलांची शक्ती खूप उपयुक्त असते. परंतु आपल्या देशातील काही लोकं थोड्या पैशांच्या हव्यासापोटी आपल्या मुलांना बालमजुरीच्या कामाला लावून देतात. कमी पैशात कामगार मिळत असल्याने हॉटेल कारखाने व दुकानांचे मालकही या मुलांना कामावर ठेवून घेतात.**

बालकामगार व बालमजुरी ही समस्या फक्त भारतात नसून जगातील अनेक विकसनशील देशात मोठ्या प्रमाणात आहे. गरिबी रेषेखालील आई-वडील आपल्या मुलांच्या शिक्षणाचा खर्च करू शकत नाहीत. याशिवाय जीवन जगण्यासाठी पैशांची देखील आवश्यकता असते. म्हणूनच आपल्या मुलांना शाळेत पाठविण्याऐवजी गरीब आई-वडील त्यांना कामावर पाठवतात. आपल्या देशाची अर्थव्यवस्था मिश्र स्वरुपाची आहे. आपला देश लोकसंख्येच्या दृष्टीकोनातून जगात दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे. आपल्या देशात 10% लोकं अतीश्रीमंत, 40% मध्यमवर्गिय लोकं आणी 40% लोकं गरीब आहेत तर , 10% लोक अती गरीब आहेत. 10% लोकांमध्ये उद्योगपती येतात. 40% मध्यमवर्गीय लोकांमध्ये छोटे व्यवसायिक, 40% गरीब लोकांमध्ये मजुर वर्ग, तर 10% अतिगरिब लोकांमध्ये वेठबिगारी करणारे ( हमाल) लोकं येतात. जे गरीब आणि अतिगरिब लोकं आहेत. त्यापैकीच काही कुटुंबातील मुले हे बालमजूरी करतात.

गरीब व अतिगरिब कुटुंबात खाण्याची सोय लागत नाही. खानारी तोंडे 5 ते 6 आणि कमवणारा व्यक्ती एकच असल्यामूळे या कुटुंबात नेहमी कलह होत राहतात, वादविवाद होत राहतात. त्यामूळे अशा कुटुंबात बालमजूरीचे प्रमाण खुप जास्त दिसते.काही कुटुंबात आई किंवा वडील वारलेले असतात.काही कुटुंबात वडील खुप जास्त दारु पितात. घरचे सगळे पैसे ते दारुत खर्च करतात. त्यामूळे त्या घरात लहान लहान मुले कामाला जातात.मजबुरीने त्या मुलांना काम करावे लागते. यातील काही मुले दुकानात, शेतीत, गॅरेजवर, हार्डवेअरवर, विटांच्या पजायावर (कारखान्यावर), खनतीवर, खानीत व ईतर ठिकानी तसेच हमालीला जातात. ही सर्व कामे करत असताना खुप ठिकानी लहान मुलांना अपमान सहन करावा लागतो.खुप ठिकानी शिव्या खाव्या लागतात. हे सगळं बालमजूरी करत असताना लहान मुलांना मजबुरीने सहन करावे लागते.

हिन्दु लोकांमध्ये बालमजूरीचे प्रमाण बरेच आहे. सर्वात जास्त प्रमाण आहे ते मुसलमान वर्गात. या वर्गात तर लहान मुलांना लहान वयातच गोळ्या, बिस्किटे, पोंगे विकावे लागतात. या वर्गातील बालमजुर बांधकाम व्यवसायात, हमालीमध्ये, रिक्षा चालवणे इत्यादी कामात काम करतानी दिसतात. या मुसलमान वर्गात शिक्षणाचे प्रमाण फार कमी राहते. यात लहान मुलांना जास्त न शिकवता इतरांकडे कामाला पाठवले जाते.

तरुण मुला मुली मध्ये, तरुण पालक वर्गात, तरुण आई वडील यामध्ये लैंगिक शिक्षणाची कमतरता आहे. काही जोडपे प्रमाणापेक्षा जास्त मुला मुलींना जन्म देतात व ते त्यांचे पालनपोषण करण्यास मात्र अपुरे पडतात. यामुळे बालमजूरी वाढते. बालमजूरी हा आपल्या समाजाला लागलेला एक कलंक आहे. बालमजूरी आपल्या समाजातून कमी करणे अती आवश्यक आहे.

**बालमजुरी संदर्भात कायदेशीर तरतूद**

भारतीय राज्यघटनेच्या 1950 च्या कलम 24 नुसार 14 वर्षाखालील कोणत्याही बालकाला कारखान्यात काम दिले जाणार नाही. जर कोण्या कारखान्यात या कायद्याचे उल्लंघन होताना आढळले तर भारतीय विधिमंडळांनी फॅक्टरी ॲक्ट 1948 आणि चिल्ड्रेन ॲक्ट 1969 मध्ये तरतूद करून फॅक्टरी मालकावर दंड व कार्यवासाची शिक्षा सुनावली आहे. भारतीय राज्यघटनेच्या कलम 45 नुसार प्रत्येक राज्य शासनाचे कर्तव्य आहे की त्यांनी आपल्या राज्यातील विद्यार्थ्यांना निशुल्क शिक्षणाची व्यवस्था करावी.

**बालमजुरीत वाढ होण्याची कारणे**

दरिद्री अनाथ परिवारातील सदस्यांची बेरोजगारी किंवा अत्यल्प उत्पन्न असल्यामूळे कामाच्या निमित्ताने पालकांचे होणारे स्थानांतरण, परंपरा, कठीण चालीरीती, पालकांमध्ये शिक्षणाचा अभाव व मुलांवर नियंत्रणाचा अभाव, दुर्लक्षित आदिवासी यांच्यासाठी असलेल्या शासकीय योजना व त्यांचे नियोजन, मुलांच्या प्रश्नाकडे बघण्याची शासनाची उदासीन वृत्ती, कायद्याचे पालन करण्याचा अभाव, घरातील वादविवाद, आई वडीलानां कंटाळून खुप सगळी मुलं घर सोडून पळून जातात व बाहेर कामे करायला लागतात. शिक्षणात मन लागत नाही म्हणून कामाकडे वळणे, लवकर पैसे कमविण्याची ओढ लावणे, अशी अनेक कारणे बालमजुरी वाढण्यास कारणीभूत आहेत. जागतिक स्तरावर बघितले तर लक्षात येते की आर्थिक रूपाने गरीब देशात बालकामगारांची संख्या खूपच जास्त आहे. शिक्षणाचे महत्त्व ज्या गरिबांना पटलेले नसते त्याच कुटुंबातील मुले मजुरीला जास्त प्रमाणात जातात.

**बालमजुरीमुळे निर्माण होणारे परिणाम**

1 ) बालमजुरी केल्याने मुलांना व्यवस्थित शिक्षण घेता येत नाही. शिक्षण घेण्यामध्ये त्यांना अडचणी निर्माण होतात.

2) बालमजुरी करणारी मुलं आपल्या लहानपणाला मुकतात. त्यांना लहानपणी जे खेळता येते, बाळगता येते, ते त्यांना करता येत नाही.

3) बालमजुरी करत असताना कधी कधी लहान मुलांना हलके व सोपे काम न मिळाल्याने भारी काम करावे लागते. त्याचा असर त्याच्या शरीरावर विपरीत होतो.

4) बालमजुरी करत असताना लहान मुलांच्या शिक्षणात अडचणी निर्माण होतात . लहान मुलांना शिक्षण भेटले असते तर कदाचित त्यातून पुढे काही प्रशासकीय अधिकारी होऊ शकले असते. काही डॉक्टर, पोलीस, वकील , इंजिनियर, लेखक, कवी इत्यादी झाले असते. ते मात्र त्यांना शिक्षण न मिळाल्याने होऊ शकणार नाहीत.

5) बालमजुरी मुळे काही लहान मुलांना शिक्षण घेण्यासाठी वेळ मिळत नाही. त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्व चांगल्या प्रकारे विकसित होत नाही.

6) बालमजुरीमुळे लहान मुलांचे भवितव्य धोक्यात येते. पर्यायाने देशाचे भवितव्य धोक्यात येते.

7) बालमजुरी ही समाजाला लागलेली कीड आहे. बालमजुरी करत असताना लहान मुलांना खूपदा हॉटेल मालकांच्या, बारमालकांच्या व इतर मालकांच्या शिव्या खाव्या लागतात. त्यामुळे त्यांच्या बालमनावर या गोष्टीचा विपरीत परिणाम होतो.

8) बालमजुरी करण्यासाठी कधी कधी लहान मुली इतरांकडे काम करतात. तेव्हा त्यांच्यावर बऱ्याचदा अत्याचार होतात. त्या मुलींचा विनयभंग होतो. कधी कधी त्यांच्या बलात्कार होतात. मोठ्या प्रमाणावर त्यांचे शोषण होते. त्यामुळे लहान मुलींच्या मनावर याचा दीर्घकाळ मोठा विपरीत परिणाम होतो.

9) बालमजुरी करण्यासाठी खूपदा लहान मुलांना दुसऱ्या ठिकाणी कामाला जावे लागते. त्यामुळे त्यांना आपल्या आई वडिलांच्या



प्रेमाला मुकावे लागते.

10) बालमजुरी करत असताना लहान मुलं स्वतःच्या शिक्षणाकडे लक्ष देऊ शकत नाहीत . त्यामुळे लहानपणी त्यांच्या जीवनात त्यांच्यावर चांगले पैलू पडत नाहीत. त्यामुळे ते मुलं मोठे झाल्यावर जसा चांगला व योग्य नागरिक बनायला पाहिजे तसा तो बनत नाही.

11) कधीकधी घरची आई काही कारणास्तव मृत्यू पावलेली असते. वडील भयंकर दारू पिणारे असतात. मुलांनी कमवून आणले पाहिजे त्यामुळे वडील लहान मुलांना मारझोड करत राहतात . त्यांना त्रास देत राहतात. त्याने कमवून आणलेले सगळे पैसे वडील खर्च करुन घेतात त्या पैशाची दारू पितात. त्यामुळे मुलं वडिलांच्या त्रासाला कंटाळून कधीकधी घर सोडून जातात. बाहेर सुद्धा जीवन जगत असताना त्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यांना अनेक खस्ता खाव्या लागतात.

बालमजुरी कमी होण्याकरिता उपाय योजना.

1) सर्वात आधी तरुण पालक वर्गांना,तरुण आई-वडिलांना लैंगिक शिक्षण द्यावे. कुटुंब नियोजन काय असते ते सुद्धा त्यांना शिकवावे. तसेच अपत्य जन्माला घातल्यास त्याचे पालन पोषण करू शकले पाहिजे. असे त्यांना समजून सांगितले पाहिजे.आपले जेवढे उत्पन्न आहे ते बघूनच आपण अपत्य जन्माला घातली पाहिजेत. ही समज पालकांना व तरुण आई-वडिलांना देणे अती आवश्यक आहे.

2) बालमजुरांना कोणीही कामावर घेऊ नये असा कायदा आहे. पण त्याची सक्त अंमलबजावणी झाली पाहिजे.

3) आई-वडिलांनी लहान मुलांना कामावर पाठवणार नाही यासंदर्भात शपथ खायला हवी.

4) जे अनाथ मुलं असतील त्यांना समाजातील लोकांनी तसेच सरकारने आर्थिक मदत केली पाहिजे. जेणेकरून ते मुलं शिक्षण घेऊ शकतील.

5) अनाथ मुलांसाठी शिक्षण संस्थांनी शिक्षणासोबत त्यांच्या राहण्याची व जेवण्याची व्यवस्था करावी. जेणेकरून त्यांना व्यवस्थित शिक्षण घेता येईल.

6) अनाथ मुलांसाठी सरकारने मोठ्या स्वरूपात स्कॉलरशिप द्याव्यात .जेणेकरून त्यांना आर्थिक मदत होईल.

7) समाजातील शिक्षित, उच्चविभूषित, समजदार लोकांनी अनाथ मुलांना दत्तक घेऊन त्याचे शिक्षण व पालन पोषण करावे.

8) कोणत्याही दुकानदाराने, उद्योगाने, कंपनीने तसेच इतरांनी बालकामगार असेल म्हणजे 14 वर्ष व त्याखालील असेल तर त्याला कामावर ठेवू नये.

9) सक्तीने बालकामगार कायदा याची अंमलबजावणी करावी.

10) बालमजुरी चे तोटे काय आहेत या संदर्भात सर्वांमध्ये जागरूकता निर्माण करावी. पालक वर्ग व मुलांना सुद्धा याची माहिती देणे आवश्यक आहे.

11) बालमजुरी थांबविणे का आवश्यक आहे ? याची माहिती तरुण आई-वडील व पालकांना द्यावी.

12) बालमजूर या संदर्भात एखादी शॉर्ट फिल्म काढून या संदर्भात समाजात जनजागृती निर्माण करावी.

13) लेखकांनी वर्तमानपत्रात बालमजुरी थांबविणे का आवश्यक आहेत ? या संदर्भात लेख प्रकाशित करावेत.

14) वेगवेगळ्या कवींनी बालमजुरी थांबविणे का आवश्यक आहे? या संदर्भात कवितेची रचना करावी व यामधून जनजागृती करावी.

15) वेगवेगळ्या कॉलेजेस मध्ये, शाळांमध्ये " बालमजुरी थांबविणे योग्य की अयोग्य" या विषयावर वादविवाद स्पर्धा घ्यावी. या संदर्भात कार्यक्रमाचे आयोजन करून जनजागृती करावी.

16) बालमजुरीचे परिणाम समाजावर काय होतात. या संदर्भात समाजात जनजागृती निर्माण करणे अतीआवश्यक आहे.

17) आपण जन्माला मुल घातले तर त्याचे योग्य पालन पोषण करू शकू याची स्वताला खात्री आल्याशिवाय तरुण युवक व युवतींनी मूल जन्माला घालू नये.

18) प्रत्येक गावात ग्रामपंचायतने, प्रत्येक तालुक्याला नगरपरिषद नी, नगरपालिकांनी, जिल्ह्याच्या ठिकानी महानगरपालिकांनी, राज्यांनी आपल्या उत्पन्नातून पाच टक्के रकमेचा रिझर्व फंड तयार करावा व त्यातूनच अशा अनाथ बालमजुरांना आर्थिक मदत करावी.

19) "बालमजुरी करणे शाप की वरदान" या विषयावर शाळा महाविद्यालयांमध्ये निबंध स्पर्धा आयोजित करून" बालमजूर" या संदर्भात जनजागृती करावी.

20 ) लैंगिक शिक्षण, कुटुंब नियोजन, फ्युचर प्लॅनिंग यासंदर्भात तरुण युवक युवतींना,तरुण पालक व तरुण आई-वडिलांना शिक्षण देणे अति आवश्यक आहे.

" बालमजुरी" या विषयावरिल समस्या, कारणे, परिणाम लक्षात घेऊन वरीलप्रमाणे उपाययोजना केल्यास बालमजूरी निश्चितच कमी होईल.



# सर्वात मोठी भेट कोणती आहे ?

आधुनिक केसरी

**आपणही आपले आवडते बक्षीस, आपल्याला आवडत्या पॅकिंगमध्ये न मिळाल्यामुळे, अनवधानाने त्याला हरवून बसतो.आपण आपल्या आई-वडिलांनी, आपल्याला प्रेमाने दिलेल्या अशा अगणित भेट वस्तूंचे मोजमापच करू शकत नाही किंवा त्याला समजूच शकत नाही. ईश्वर देखील आपल्याला प्रत्येक क्षणी कितीतरी भेटवस्तू देत असतो. परंतु आपण आपल्या नादानपणामुळे, त्या आवडत्या पॅकिंगमध्ये न मिळाल्याने, त्यांना हरवून बसतो. आपलं आयुष्य देखील एक भेटच आहे, सर्वात मोठी भेट! एक असंतुलित मन, हे आपली अंतर्दृष्टी आणि आपली दिशा हरवून बसते."**

एका उद्योगपतीचा मुलगा कॉलेजमध्ये शेवटच्या वर्षाच्या परीक्षेची तयारी करत होता. जेंव्हा त्याचे वडील त्याला परीक्षेविषयी विचारत असत,तेंव्हा तो उत्तर देताना वडिलांना म्हणत असे की, "पिताजी असं होऊ शकतं, की मी कॉलेजमध्ये प्रथम येईन, जर मी प्रथम आलो तर तुम्ही मला माझ्या आवडीची, ती महाग कार भेट म्हणून द्याल का?"वडील आनंदाने म्हणाले, "का नाही, अवश्य आणून देईन बेटा." हे त्यांच्यासाठी सहज शक्य होतं. कारण त्यांना पैशाची काहीच कमतरता नव्हती.

हे ऐकल्यानंतर मुलगा दुप्पट उत्साहाने अभ्यासाला लागला. रोज कॉलेजमध्ये येता- जाता, तो शोरूम मध्ये ठेवलेल्या कारकडे निरखून बघत असे आणि मनातल्या मनात कल्पना करत असे की तो आपली आवडती कार चालवत आहे.

दिवस सरले आणि परीक्षा संपली. रिझल्ट आला, तो कॉलेजमध्ये प्रथम आला होता. त्याने कॉलेजमधूनच वडिलांना फोन करून सांगितलं की, " पिताश्री, माझं बक्षीस तयार ठेवा. मी घरी येत आहे."

घरी येता येता, तो मनातल्या मनात घराच्या अंगणात गाडी उभी असल्याचं स्वप्न रंगवत होता. ज्यावेळी तो घरी पोहोचला, त्याला तिथे कोणतीही कार दिसली नाही. तो नाराज मनानेच वडिलांच्या खोलीमध्ये गेला. त्याला बघताच वडिलांनी त्याला मिठी मारून त्याच अभिनंदन केलं आणि त्याच्या हातात कागदामध्ये गुंडाळलेली एक वस्तू दिली आणि म्हणाले, "हे घे, तुझं बक्षीस." मुलाने नाराजीनेच,ती भेटवस्तू आपल्या हातामध्ये घेतली आणि आपल्या खोलीमध्ये गेला. मनातल्या मनात कार न मिळाल्यामुळे,तो क्रोधाच्या अग्नीमध्ये जळू लागला. नाराज मनाने त्याने वडिलांनी दिलेल्या भेटवस्तूचा कागद उघडून बघितला,तर त्यामध्ये सोनेरी कव्हर मध्ये त्याला ' रामायण' दिसलं. ते पाहून त्याला आपल्या वडिलांचा खूप राग आला.

रागाने त्याच्या बुद्धीला भ्रमित केलं. त्याने एक चिठ्ठी आपल्या वडिलांच्या नावे लिहिली की, "पिताजी, तुम्हीं मला कार भेट न देता, हे रामायण दिलत. तुम्हीं वचन देऊनही माझ्याबरोबर असं का केलंत, मला माहित नाही... म्हणून मी हे घर सोडून जात आहे आणि तोपर्यंत परत येणार नाही जोपर्यंत मी खूप पैसा कमावणार नाही." आणि ती चिठ्ठी, रामायण बरोबर तिथेच टेबलावर ठेवून,तो घर सोडून निघून गेला.

काळ सरत होता...

मुलगा हुशार होता, सद्गुणी होता. लवकरच तो श्रीमंत बनला. कधी- कधी त्याला आपल्या वडिलांची आठवण येत असे, परंतु त्याच्या वडिलांकडून त्याला भेट न मिळाल्यामुळे असलेला राग, डोकं वर काढत असे.तो विचार करत असे,की आई गेल्यानंतर माझ्याशिवाय त्यांना कोण होतं. इतका पैसा असूनही माझी छोटीशी इच्छा देखील माझ्या वडिलांनी पूर्ण केली नाही. हा विचार करून तो वडिलांना भेटण्यासाठी कचरत असे.

एक दिवस त्याला आपल्या वडिलांची खूप आठवण येऊ लागली. त्याने मनातल्या मनात विचार केला 'इतक्या छोटया गोष्टीसाठी मी आपल्या वडिलांवर नाराज झालो. हे चांगलं झालं नाही.' हा विचार करून त्याने आपल्या वडिलांना फोन लावला. खूप दिवसानंतर,तो आपल्या वडिलांशी बोलणार असल्या कारणाने, धडधडत्या अंतकरणाने रिसीवर हातात घेऊन उभा राहिला. घरातील नोकराने फोन उचलला आणि सांगितले की," मालकांचा दहा दिवसां पूर्वीच स्वर्गवास झाला आहे.ते शेवटपर्यंत तुमची आठवण काढत होते आणि रडत- रडत निधन पावले. जाता जाता म्हणाले, की माझ्या मुलाचा फोन आला तर त्याला सांगा, की येऊन आपला व्यवसाय सांभाळ. तुमचा काहीही पत्ता नसल्यामुळे, आम्ही तुम्हांला कळवू शकलो नाही."

हे ऐकल्यानंतर मुलाला खूप मोठा धक्का बसला आणि जड अंतःकरणाने तो वडिलांच्या घरी जायला निघाला. घरी पोचल्यावर वडिलांच्या खोलीमध्ये जाऊन त्यांच्या फोटो समोर, रडत- रडत दुःखी मनाने त्याने वडिलांनी दिलेली भेटवस्तू, 'रामायण' उचलून आपल्या कपाळाला लावली आणि ते उघडून पाहिले. पहिल्या पानावर वडिलांनी लिहिलेलं वाक्य वाचलं ज्यामध्ये लिहिलं होतं, "माझ्या लाडक्या मुला, तुझी काळानुसार खूप भरभराट होऊ दे...आणि त्याचबरोबर मी तुला चांगले संस्कार ही देऊ इच्छितो.... हा विचार करून हे ' रामायण ' देत आहे. "

हे वाचत असतानाच, त्या रामायणा मधून एक लिफाफा घसरून खाली पडला, ज्यामध्ये त्याच्या आवडत्या गाडीची किल्ली आणि रोख रकमेचे बिल ठेवलेले होते.

हे बघून त्याला इतकं दुःख आणि आत्मग्लानी झाली, की तो स्वतःला सांभाळू शकला नाही, आणि जमिनीवर पडून धायमोकलून रडू लागला.

आपणही आपले आवडते बक्षीस, आपल्याला आवडत्या पॅकिंगमध्ये न मिळाल्यामुळे, अनवधानाने त्याला हरवून बसतो. आपण आपल्या आई-वडिलांनी, आपल्याला प्रेमाने दिलेल्या अशा अगणित भेट वस्तूंचे मोजमापच करू शकत नाही किंवा त्याला समजूच शकत नाही. ईश्वर देखील आपल्याला प्रत्येक क्षणी कितीतरी भेटवस्तू देत असतो. परंतु आपण आपल्या नादानपणामुळे, त्या आवडत्या पॅकिंगमध्ये न मिळाल्याने, त्यांना हरवून बसतो. आपलं आयुष्य देखील एक भेटच आहे, सर्वात मोठी भेट! एक असंतुलित मन, हे आपली अंतर्दृष्टी आणि आपली दिशा हरवून बसते."

# वैचारिक कवितांचा संग्रह 'हिरव्या सूक्तांच्या प्रदेशात'



प्रज्ञा पंडित, ठाणे
संपर्क क्र. 9320441116

आधुनिक केसरी

**परिपक्व लेखनशैली असलेले प्रगल्भ धाटणीचे पुस्तक नुकतेच हातात आले. कवयित्री संजीवनी बोकील लिखित अतिशय संवेदनशील आणि वैचारिक कवितांचा संग्रह असलेल्या ह्या काव्य संग्रहाचे नाव आहे ' हिरव्या सुक्तांच्या प्रदेशात '! सदैव उत्तमोत्तम साहित्यकृती देणाऱ्या पुणे येथील सौर प्रकाशन 'संस्थेतर्फे प्रकाशित झालेला हा काव्य संग्रह 24 मार्च 2022 रोजी वाचकांच्या भेटीला हजर झाला आणि अल्पकाळातच काव्य प्रेमींची दाद मिळवण्याचा मानकरी ठरला. ह्या संग्रहाचे मुखपृष्ठ आणि आतील रेखाचित्रे श्री विराज गपचुप यांनी रेखाटली आहेत तर मांडणी आणि सजावटीची धुरा श्री साईप्रसाद पड्याळ यांनी सांभाळली आहे. प्रतिमा ऑफसेट तर्फे मुद्रित झालेल्या ह्या काव्य संग्रहातील अप्रतिम सुलेखन साक्षी कुलकर्णी यांनी केले आहे.**

काही पुस्तके त्यांच्या शीर्षकांनीच औत्सुक्य निर्माण करतात. ही नावीन्यपूर्ण शीर्षके ती पुस्तके कथा संग्रह आहेत, कादंबरी आहे की काव्य संग्रह याबद्दल कमालीचे कुतूहल निर्माण करणारी असतात. आणि म्हणूनच ती लक्षवेधी ठरतात. मुळात कोणत्याही प्रकारचे लेखन हे त्या लेखकाची कल्पनाशक्ती, वैचारिक परिसीमा, सद्सद्विवेक बुध्दी, सामाजिक जाणिवा, संवेदनशीलता स्पष्ट करत असते. एकूणच लेखनात दिसून येत असलेली प्रगल्भता हे त्या लेखकाचे व्यक्तिमत्व प्रतिबिंबित करणारी असते असे मला वाटते.

आपली मराठी भाषा ही भारतातल्या काही प्राचीन भाषांपैकी एक आहे. शतकानुशतके समृद्ध होत आलेल्या ह्या भाषेला साहित्याचा एक समृद्ध वारसा लाभला आहे. अनेक ग्रंथ, कथा, कादंबऱ्या, आत्मचरित्रं कवितासंग्रह ह्यांनी आपली साहित्य संस्कृती नटली आहे. रामदास स्वामींपासून पु. ल.- व.पु. पर्यंत आणि ज्ञानेश्वर-तुकाराम महाराजांपासून अगदी आजच्या संदिप कुलकर्णी, गुरू ठाकूर पर्यंत प्रत्येकानं त्यांच्या अनेक दर्जेदार लिखाणांनी ती श्रीमंत केली आहे. चोखंदळ मराठी वाचकांनी त्याला नेहमीच उस्फूर्त दाद दिली आहे. आजही आपल्यापैकी अनेकांकडे स्वतः चा पुस्तक संग्रह असतो. त्यातील आवडत्या पुस्तकांची आपण अनेकदा पारायणं देखील करतो. बऱ्याच कविता, अभंग ओव्या आपल्याला अगदी तोंडपाठ असतात. चांगल्या साहित्याचा आनंद घेणं, ते जपणं, वाढवणं हे आपण मराठी माणसं पिढ्यानपिढ्या करत आलो आहोत. आपलं हे साहित्य प्रेम आजच्या स्मार्टफोन संस्कृतीतही कमी झालेलं नाहीये. उलट EPUB, PDF, KINDLE अशा अनेक नव्या रुपात मराठी साहित्य प्रत्येक हातात पोहोचू लागलं आहे आणि त्याचं संवर्धन आणि संग्रह करणे आता अजून सोपं झालं आहे.

अशीच परिपक्व लेखनशैली असलेले प्रगल्भ धाटणीचे पुस्तक नुकतेच हातात आले. कवयित्री संजीवनी बोकील लिखित अतिशय संवेदनशील आणि वैचारिक कवितांचा संग्रह असलेल्या ह्या काव्य संग्रहाचे नाव आहे ' हिरव्या सुक्तांच्या प्रदेशात '! सदैव उत्तमोत्तम साहित्यकृती देणाऱ्या पुणे येथील सौर प्रकाशन 'संस्थेतर्फे प्रकाशित झालेला हा काव्य संग्रह 24 मार्च 2022 रोजी वाचकांच्या भेटीला हजर झाला आणि अल्पकाळातच काव्य प्रेमींची दाद मिळवण्याचा मानकरी ठरला. ह्या संग्रहाचे मुखपृष्ठ आणि आतील रेखाचित्रे श्री विराज गपचुप यांनी रेखाटली आहेत तर मांडणी आणि सजावटीची धुरा श्री साईप्रसाद पड्याळ यांनी सांभाळली आहे. प्रतिमा ऑफसेट तर्फे मुद्रित झालेल्या ह्या काव्य संग्रहातील अप्रतिम सुलेखन साक्षी कुलकर्णी यांनी केले आहे.

एक सर्वांगसुंदर, बहारदार पुस्तक वाचकांच्या भेटीला आणताना लेखकाबरोबरच मुद्रक, प्रकाशक, सुलेखक, मुखपृष्ठकार या सर्वच श्रेष्ठींचा मोलाचा वाटा असतो त्यामुळे त्यांचा इथे सन्माननीय नामोल्लेख करत आहे.

हा काव्य संग्रह वाचकांच्या संग्रही का असावा याची माझ्या मते अनेक कारणे आहेत. अगदी पुस्तकाच्या अर्पण पत्रिका पानापासून सुरुवात करायची तर जेमतेम एका ओळीचे हे अर्पण पत्र वाचकांची ' वाहवा ' मिळवते.

या अर्पण पत्रिकेत कवयित्री लिहितात की,

***माझी कोवळी पाने***
***सनय आणि स्वप्नाला...***
***ज्यांनी मला जगण्यासाठीचा***
***शुद्ध, हिरवा***
***प्राणवायू पुरवला....***

सदर काव्यसंग्रहात समाविष्ट केलेल्या कविता ह्या कवयित्री संजीवनी बोकील यांच्या उच्च आणि समृद्ध विचारसरणीच्या द्योतक आहेत. धीरगंभीर असे अनेक भावाविष्कर ह्या कविता संग्रहात तुम्हाला वाचायला मिळतील.

काही विशेष उल्लेखनीय कवितांचा मी आवर्जून येथे उल्लेख करते जेणेकरून काव्यसंग्रह हाती येताच तुम्ही त्या कविता आवर्जून वाचाल अशी मला खात्री आहे.

अव्यक्ताची वादळे ही सुलेखांकीत पहिलीच कविता!

या कवितेत कवयित्री लिहितात,

अव्यक्ताची वादळे
शिरतील आता
हिरव्या सुक्तांच्या प्रदेशात
घुमतील घोष...

मनुष्याच्या मनात कितीतरी वादळे दडलेली असतात. अनेक भावभावनांची, मानापमानाची ही वादळे, ही घुसमट मनातून व्यक्त होण्यासाठी आतुरही असते पण तत्क्षणी स्वतः भोवतीचे अंतर्मुखतेचे कवच अबाधित राहण्यासाठी सावधही असते. ह्याच मानसिक विचारांच्या आंदोलनांचे शब्दांकन या कवितेत कवयित्रिने केले आहे.

***गळ्यापर्यंत बुडून***
***जीवाने आकांत केला***
***तेव्हा कवितेचा चर खोदला***
***भळभळ वाहून गेलं***
***गढूळ पाणी***
***मागे उरली मऊ माती...***

व्यक्त होणे, संवाद साधणे ही मनुष्याची भावनिक गरज आहे. आणि म्हणूनच जे गद्यातून व्यक्त केले जाऊ शकत नाही, भाष्य




केले जाऊ शकत नाही ते कवितेतून तितक्याच सहजरीत्या मांडले जाऊ शकते. आपले मर्म,आपली सल कवितेतून व्यक्त केल्यावर मन हलके होते,जगण्यास पुन्हा नवीन उमेद मिळते हे या कवितेतून सांगितले आहे.

हे दयानिधे
अनंता उदारा
त्रैलोक्यदीपा दावी किनारा
जीर्ण नाव माझी
भवसागर भवती

ही प्रार्थना ही भगवंताच्या आळवणीने मन कृतार्थ करणारी आहे.

निसर्ग आणि मन याचे नाते फार जवळचे आहे.

मनाला प्रफुल्लित किंवा उदासीन करण्याचे सामर्थ्य निसर्गाकडे असते. म्हणूनच प्रत्येक कवी, कवयित्रीच्या लेखणीतून पाऊस या विषयावर लिहिले गेले आहे.

याही काव्य संग्रहात आपल्याला याविषयीची कविता वाचायला मिळते...,

***दूर डोंगरात***
***पाऊस कोसळे***
***कशासाठी डोळे***
***भरतात!***
***कोणते काहूर***
***दाटून गळ्याशी उभी दारापाशी***
***तिन्हीसांज!***

संग्रहातील प्रत्येक कविताच आवर्जून उल्लेख करावा अशी आहे. पण कवितेबरोबरच त्या सर्व कवितांचे शीर्षक अतिशय विचारपूर्वक आणि कलात्मकतेने लिहिले गेल्याने उल्लेखनीय झाले आहेत.

उदाहरण द्यायचे झाले तर,

***बेटावर एकांताच्या सळसळले***
***जे पाण्यावरती लिहिले***
***वेड्या मनाचं अथांग राज्य***
***मौनाच्या पडद्यापाशी***
***बसस्टॉपवरचे गलबत***
***वाहत्या पाण्यावरच्या फेसफुलांना***
***आकाशमोगरी खाली***
***चिंब ओलेत्या वेलीला***

या सर्व कविता त्यांच्या नावीन्यपुर्ण शिर्षकासह वाचनीय झाल्या आहेत.

लेखिका कवयित्री संजीवनी बोकील यांच्या लेखनाचे कौतुक करत कवी कुसुमाग्रज, वसंत कानेटकर, संजीवनी मराठे आणि सुधीर मोघे अशा अनेक रथी महारथी यांनी केले आहे. पुस्तकाच्या सुरुवातीलाच या शुभेच्छापत्रांना मानाचे स्थान देऊन सकारात्मक आणि प्रेरणादायी शब्दांनी संग्रहाची सुरुवात लेखिकेने केली आहे.

काही पुस्तके ही वाचनालयात, प्रदर्शनात, एकमेकांना भेट देण्यास अगदी समर्पक अशी असतात तसेच ' हिरव्या सुक्तांच्या प्रदेशात ' हे पुस्तक देखील आहे. पण त्याही पेक्षा , महाविद्यालयीन मराठी अभ्यासक्रमात हे जरूर अंतर्भूत असावे जेणेकरून आधुनिक मराठी वाङमयाचा पदवी आणि पदव्युत्तर अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना हे एक अतिशय अभ्यासपूर्ण पुस्तक वाचता आणून अभ्यासता येईल आणि आजच्या काळात , आजच्या आव्हानांना शब्दांकित करणारी नव कविता कशी आहे हे नवीन पिढीला कळेल.

सर्व ऑनलाइन माध्यमात आणि जवळच्या पुस्तक दालनात हे पुस्तक विक्रीसाठी उपलब्ध आहे. सर्व वाचकांनी हे पुस्तक आवर्जून वाचावे.

लेखिका कवयित्री संजीवनी बोकील यांच्या पुढील लेखन प्रवासासाठी खूप खूप शुभेच्छा!

# अजब कोकणातील गजब चालीरीती

आधुनिक केसरी

**कोकणात नैसर्गिक चमत्कारांची अशी उदाहरणे आहेत तशीच चमत्कारिक रीती-रिवाजांचीसुद्धा कितीतरी ठिकाणे आहेत. कोकणातील अशा असंख्य ठिकाणच्या चालीरीती व गूढता समजून घेवून अश्या अद्भुत ठिकाणांना पर्यटनाच्या नकाशावर आणण्यासाठी प्रयत्न करायला हवेत.**

मालवण-कुडाळ रस्त्याला चौक्याच्या पुढे असलेल्या धामापूर गावाजवळ कासार टाका नावाचे एक विलक्षण ठिकाण आहे. अगदी रस्त्यालगत, निर्मनुष्य जागेत असलेल्या कासार टाक्याला माणसे वेगवेगळे नवस बोलतात. त्यामुळे भक्ताची कसलीही अडचण दूर होते. अडलेली कामे होतात, अशी अनेकांची श्रद्धा आहे. नवस फेडायचा असेल तर कोंबडा, दारू व सिगारेट यांचा नैवेद्य इथल्या ''ठिकाणा''ला देण्याची प्रथा आहे. कारण पूर्वीच्या काळी गावोगाव फिरून बांगडया विकणाऱ्या कासाराला या आडवाटेवर गाठून वाटमारी करणाऱ्यांनी क्रूरपणे मारले. तेव्हापासून तो कासार इथे येणाऱ्या प्रत्येकाच्या मदतीला धावून येतो असा समज आहे.

सावंतवाडी तालुक्यात दाभील नावाचे एक गाव आहे. या गावात एकही विहीर नाही. किंबहुना विहीर मारली तर पाणीच लागत नाही. परंतु वरच्या भागात गुळगुळीत काळ्याशार दगडात सात (बावी) विहिरी आहेत. या निसर्गनिर्मित विहिरींचे पाणीच साऱ्या गावाची तहान भागवते. कोकणात नैसर्गिक चमत्कारांची अशी उदाहरणे आहेत तशीच चमत्कारिक रीती-रिवाजांचीसुद्धा कितीतरी ठिकाणे आहेत.

मातोंड हे एकही चहाचे दुकान नसलेले गाव. येथील जत्रेतसुद्धा चहाचे हॉटेल लावत नाहीत. गावात दारू प्यायला बंदी. पण डोंगरात भरणारी घोडेमुखची जत्रा हा देव ब्राह्मण असून त्याला शुद्ध शाकाहारी नैवेद्य दिला जातो आणि त्याच्या गणांना मात्र कोंबडयाचा नैवेद्य द्यावा लागतो. म्हणून या जत्रेला कोंब्याची जत्रा म्हणतात.

देवगड तालुक्यातील नारिंग्रे गावात कोणीही कोंबडी पाळीत नाहीत. अगर बाहेरून आणून खाऊ शकत नाही. गावाचे तसे कडक नियम आहेत. तर म्हापण गावात येसू आकाच्या देवळात नवस फेडायचा असेल तर सुक्या बांगडयाची चटणी आणि



नाचण्याची भाकरी असा अस्सल मालवणी बेत करावा लागतो. उभादांडा येथे मानसीचा चाळा नावाचे एक जागृत स्थळ आहे. तिथे नवस फेडायचा असेल तर खेकड्यांची माळ आणि गॅसची बत्ती देतात. या चाळ्याच्या जत्रेला बत्तेची जत्रा म्हणतात.

परुळे गावच्या येतोबाच्या देवळात म्हणे, भिंतीला लोखंडी खंजीर चिकटतो. या उत्सवाला बाक उत्सव म्हणतात तर आरवली गावात वेतोबाचे सुप्रसिद्ध देऊळ आहे. त्याचा नवस फेडण्यासाठी सोनकेळीचा घड आणि चामडयाची चप्पल भेट म्हणून देतात. वेताळाला दिलेली ही चप्पले ठेवल्या जागेवर आपोआप झिजतात. अशी झिजलेली चप्पले आजही पाहायला मिळतात.

सुनील इनामदार

मालवण तालुक्यातील पेंडुर गावचे मसणे-परब लग्न लावण्याआधी देवळाच्या आवारात स्मशानातले सगळी विधी करून मग लग्नाच्या बोहल्यावर उभे राहतात. याच तालुक्यातील कोईल गावातील रहिवासी हे लग्नपत्रिकेवर गणपती प्रतिमा छापत नाहीत. कोणाच्याच घरी गणपती पूजन करीत नाहीत. भिंतीवर गणपतीचे कॅलेंडरसुद्धा लावीत नाहीत. कणकवली तालुक्यातील कुर्ली गावचे पाटील घराण्यातले लोक तुळशीच्या लग्नादिवशीच म्हाळ घालतात. तर वालावल गावातील एकही माणूस पंढरपूरला जात नाही.

फोंडाघाट येथील वाघोबाचे मंदिर हे समस्त अनिष्ट शक्तींना रोखून धरणारे शक्तिस्थळ आहे असे मानतात. इथले मंदिर कोंबडा आरवायच्या आत फक्त एका रात्रीत बांधायचे अशी विचित्र अट होती. शेवटी गावकऱ्यांनी धाडस करून अतिशय नियोजनपूर्वक सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंतच्या वेळेत मंदिराचे बांधकाम पूर्ण केले.

पुराणात ज्याचा एकचक्रानगरी म्हणून उल्लेख आहे ते गाव वैभववाडी तालुक्यात सह्याद्रीच्या निबीड अरण्यात आहे. इथे मोठमोठ्या गुहा असून त्यात गाडाभर अन्न खाणाऱ्या बकासुराचे वास्तव्य होते असे सांगितले जाते. दगडात कोरलेला महाल आणि काळ्या दगडाचा प्रशस्त पलंग आजही तेथे आहे. पांडवांना अन्न पुरवणाऱ्या ब्राह्मणाचा वाडाही जवळ आढळतो. या दुर्गम भागात प्रशस्त गुहा आहेत, पांडवांची लेणी आहेत आणि भरपूर पाण्याचे साठेही आहेत. अंगी खूप धाडस आणि चिकाटी असल्याशिवाय इथे पोहोचणे खूप अवघड आहे. अरण्यातील या विशिष्ट जागेला राकसमाळ असेही म्हणतात.

कोकणातील अशा असंख्य ठिकाणच्या चालीरीती व गूढता समजून घेवून अश्या अद्भुत ठिकाणांना पर्यटनाच्या नकाशावर आणण्यासाठी प्रयत्न करायला हवेत.

# विनोदी अभिनेते : शरद तळवलकर

आधुनिक केसरी



कॉमेडीच्या दुनियेतील खराखुरा बादशहा सर्वांना पोट धरून हसायला लावणारे विनोदवीर शरद तळवलकर यांचा जन्म १ नोव्हेंबर १९१८रोजी बोधेगाव, अहमदनगर येथे झाला. मराठी चित्रपटसृष्टीत, नाट्यसृष्टीत अभिनयाने छाप पाडली. शालेय जीवनात पुणे येथील भावे स्कूलमध्ये रणदुंदंभी नाटकात शिशुपाल,व साष्टांग नमस्कार या नाटकामध्ये भद्रायू भाटकर पात्र उत्तमरीत्या. साकारले.येथुनच त्यांनी रंगभुमीवर पाऊल टाकले. केशवराव दाते यांच्या नाट्यमंडळात नोकरी केली. छापील संसार नावाच्या व्यवसायीक नाटकात त्यांनी अभिनयाची चुणूक दाखवली. अभिनय करतानाच मिलीटरी अकौंटसमध्ये नोकरी केली. पुढे त्यांचे शिक्षण चालुच होते. माझा मुलगा हा त्यांचा पहिला चित्रपट बालगंधर्व यांच्याबरोबर एकच प्याला नाटकात तळीरामाची भुमिका रंगवली तळीरामाच्या भुमिकेने बालगंधर्व यांनी त्यांना शाबासकीची थाप दीली बालगंधर्व यांच्या कौतुकास ते पात्र ठरले. लग्नाची बेडी नाटकातील गोकर्ण, भावबंधन मधील कामन्ना, अपराध मीच केला मधील गुप्ते काका, 'दिव्या जळू दे'मधील गोळे मास्तर अशा वैविध्यपूर्ण भूमिका साकारल्या. यासह अनेक नाटकं, चित्रपटसृष्टीत आपल्या खुमासदार शैलीत भुमिका साकारल्या.लग्नाची गोष्ट, पेडगावचे शहाणे, वाट चुकलेले नवरे, बायको माहेरी जाते. मुंबईचा जावई, एकटी, अखेर जमलं, रंगल्या रात्री अशा, तुळस माझ्या अंगणी, जावई विकत घेणे, अष्टविनायक, गडबड घोटाळा, गौराचा नवरा, धुमधडाका, वरदक्षिणा असे कितीतरी चित्रपट आहेत मराठी रंगभूमीवर अधिराज्य त्यांनी गाजवले. आपला अचुक संवाद ,अचुक टायमिंग साधून कसदार विनोदी भूमिका केल्या. शेवटपर्यत रसिकांना खळखळून हसवले.आपल्या कामाशी नेहमी प्रामाणिक एकनिष्ठ राहिले. १९९२ मध्ये वाशी येथे भरलेल्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे त्यांनी अध्यक्षपद भुषविले. कॉमिडीच्या दुनियेतील ते बादशहाच होते. २१ऑगस्ट २००१ रोजी पुणे येथे जेष्ठ अभिनेते शरद तळवलकर यांनी जगाचा निरोप घेतला. मात्र आजही त्यांच्या कसदार अभिनयाने ते रसिकांच्या हृदयावर अधिराज्य गाजवत आहेत. त्यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन...!

संतोष दत्तू शिंदे
मो. ७७२१०४५८४५

# स्वाभिमानी शेतकरी संघटनेची गांधीगिरी

## बारामती ॲग्रोचे उसाचे ट्रक्टर अडविले



आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** येथे स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पहिल्या ऊस परिषदेमध्ये झालेले ठरावाचे निवेदन देण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी सोमवारी कन्नड कारखाना येथील बारामती ॲग्रो येथील कार्यालयात गेले असता. कारखाना प्रशासनाने निवेदन घेण्यास स्पष्ट नकार देऊन बाहेरचा रस्ता दाखवला. नंतर शेतकरी व स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी आक्रमक झाल्यानंतर निवेदन स्वीकारले. मात्र निवेदनाची पोहच देण्यास नकार दिला. त्यामुळे सदर निवेदन शेतकऱ्यांनी तहसीलदार, पोलीस ठाणे या ठिकाणी दिले. कारखान्याने निवेदन न घेतल्याने संतप्त शेतकऱ्यांसह स्वाभिमानी शेतकरी संघटनेने पाणपोही येथे बारामती ऍग्रोच्या साखर कारखान्याच्याविरोधात घोषणा देत कारखाण्याला ऊस वाहतूक करनाऱ्या ट्रॅक्टरला थांबवले व गांधींगिरी करत ट्रॅक्टर ड्राइव्हरला पुष्पहार घालून उद्यापासून कारखाण्याला ऊस वाहतूक बंद करण्याची विनंती केली. अन्यथा चक्का जॅम आंदोलन करणार असल्याचा इशारा यावेळी शेतकरी संघटनेच्या पदअधिकारी यांनी दिला .



# आंदोलनाशिवाय सुखनानदी संवर्धनासाठी पर्याय नाही : डॉ. हुसे

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** सुखना नदी ही प्रचंड प्रदुषित होऊन अतिक्रमणाच्या विळख्यात सापडली आहे, तिचे अस्तित्व धोक्यात आले आहे. सुखनास गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी समविचारी शिक्षक, पत्रकार, युवक, सामाजिक कार्यकर्ते यांनी एकत्र येऊन दोन वर्षापूर्वी सुखना बचाओ जन आंदोलन संघर्ष समिती स्थापन करून नदी काठच्या गावात जाऊन शिवार फेरी, जनसंवाद यात्रा, काढून तसेच शासन, प्रशासन आणि लोक प्रतिनिधी, मनपा, प्रदुषण नियंत्रण मंडळ यांना निवेदने दिली परंतु कोणतीही दखल घेतली गेली नाही. त्यामुळे समितीच्या पदाधिकाऱ्यांची बैठक दि. ३१ ऑक्टोंबर २०२२ रोजी जालना रोड वरील हॉटेल काळे बंधू येथे संपन्न झाली.य वेळी सर्व पदाधिका ऱ्यांनी आगामी काळात एक आंदोलन करण्याचा निर्णय घेतला. यावेळी संघर्ष समिती चे संस्थापक व मुख्य समन्वयक डॉ. शिवाजी हुसे यांनी दोन वर्षातील समितीच्या कार्याचा आढावा घेतला. शासन व प्रशासन दखल घेत नसल्यामुळे आता आंदोलनाशिवाय पर्याय नाही असे मत व्यक्त केले. लवकरच मुख्यमंत्री , उपमुख्यमंत्री व पर्यावरण मंत्री यांना मंत्रालयात भेट घेऊन निवेदन देणार आहोत. लोकशाही मार्गाने व कायदेशिर पद्धतीने हे आंदोलन पुढे घेऊन जाणार आहोत. अध्यक्ष अशोकराव काळे म्हणाले की गावा गावात जाऊन बैठका घेऊन हा लढा अधिक तीव्र करावा लागेल. महाराष्ट्र शासनाच्या चला नदीला जाणूया या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त ७५ नद्या अमृत वाहिनी करण्याच्या यादीत सुखनाचा समावेश करा अशी मागणी केली. सचिव डॉ. बाळासाहेब बेळगे म्हणाले की नदी पात्रात रसायन मिश्रित पाणी सोडणाऱ्या कंपन्या विरोधी भूमिका घेऊन त्यांना निवेदन द्यावे लागेल. तसेच विविध पद्धतीने ही चळवळ गतिमान करावी लागेल असे विचार मांडले. सुरेश जुए पाटील, रामेश्वर पळसकर, नितिन हुसे, चंद्रकांत मुगले, प्रा. बाबासाहेब पठाडे, प्रा. एकनाथ डोळे, अजिंक्य ढाकणे, अनिल वावरे यांनी आपले विचार व सूचना मांडल्या. यावेळी संघर्ष समितीच्या पदाधिकार्यांना नियुक्ती पत्रे प्रदान करण्यात आले. डॉ. बाळासाहेब बेळगे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. बैठकिस प्रा. बाळासाहेब बोरसे , यांची उपस्थिती होती. बैठकिचे व दिपावली स्नेहमिलन कार्यक्रमाचे संयोजन सुखना बचाओ जन आंदोलन संघर्ष समितीचे अध्यक्ष अशोकराव काळे यांनी केले होते. बैठकिस समितीचे पदाधिकारी उपस्थित होते. आभार अशोकराव काळे यांनी मानले.

# कुस्तीपटू पांडुरंग मोहरे यांचा कोहिनूर महाविद्यालयात सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** येथे रविवारी झालेल्या भव्य कुस्ती स्पर्धेत उत्कृष्ट कुस्तीचे प्रदर्शन करीत कुस्ती स्पर्धेत प्रथम पारितोषिक पटकावले कुस्तीपटू पांडुरंग मोहरे यांचा कोहिनूर महाविद्यालयात सत्कार कोहिनूर एज्युकेशन सोसायटी औरंगाबाद चे अध्यक्ष डॉ. मजहर खान यांनी सोमवारी भव्य सत्कार केला. खुलताबाद येथे रविवारी झालेल्या राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत पांडुरंग मोहरे यांनी बाजी मारत प्रथम पारितोषिक एकवीस हजार रुपये रोख आणि चांदीचा गदा जिंकला. दरम्यान प्रथम पारितोषिकांसाठी पाच कुस्त्यांचे सामने झाले हे उल्लेखनीय. कोहिनूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. मजहर खान आणि आदर्श एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मकसूद खान यांच्या वतीने या कुस्ती स्पर्धेत एक लाख पाच हजार रुपयांची पहिली पाच बक्षिसे देण्यात आली. यावेळी कोहिनूर एज्युकेशन सोसायटीच्या सचिव अस्मा खान, सोसायटीचे संचालक मोहसीन खान, खुलताबाद नगरपरिषदेचे माजी उपाध्यक्ष सुरेश मरकड, पंच सज्जनसिंग जारवाल यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.



# पुण्यात कॉन्स्टेबलकडून महिलेला बेदम मारहाण

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** पुण्यात एका महिलेला कॉन्स्टेबलने पोलिस चौकीत बेदम मारहाण केली आहे. या मारहाणीत या महिलेच्या चेहऱ्याला गंभीर इजा झाली आहे. या महिलेने तिच्या दुकानासमोर नो पार्किंमध्ये गाडी लावणाऱ्या राहुल शिंगे नावाच्या कॉन्स्टेबलला विरोध केल्यामुळे शिंगेने या महिलेला मारहाण केली. कांचन दोडे असे मारहाण झालेल्या महिलेचे नाव आहे. शिंगेने केलेल्या मारहाणीमुळे कांचन दोंडे यांच्या उजव्या दृष्टीवर परिणाम झाला असून त्यांना या डोळ्याने अंधुक दिसत आहे. विश्रामबाग पोलिस स्टेशनच्या हद्दीतील मंडई पोलिस चौकीच्या समोर कांचन दोंडे यांचे बांगड्यांचे दुकान आहे. 19 ऑक्टोबर रोजी शेजारच्या खडकमाळ पोलिस स्टेशनमध्ये काम करणारा राहुल शिंगे नावाचा कॉन्स्टेबलने त्याची दुचाकी दोंडे यांच्या दुकानासमोर लावली. दोंडे यांनी त्याला आक्षेप घेतला. पोलिस चौकीत कॉन्स्टेबल शिंगे यांनी कांचन दोंडे यांना मारहाण केली.

# पीक विम्यासाठी उपसरपंच रवींद्र चव्हाण यांची जनजागृती

## पावसामुळे पिकांचे झालेल्या नुकसानीचे तक्रारीचे शेतकऱ्यांनी भरून ठेवलेले फॉर्म चव्हाण यांनी केले जमा

आधुनिक केसरी न्यूज

**लासूर स्टेशन :** सततचा पाऊस अतिवृष्टी व दिनांक 20 व 21 ऑक्टोबर 2022 रोजी हर्सूल व डोणगाव महसूल मंडळामध्ये झालेल्या ढगफुटी सदृश पावसामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. त्यामध्ये कापूस, बाजरी, सोयाबीन व इतर पिकांचे या सततच्या पावसामुळे, अतिवृष्टीमुळे व ढगफुटीच्या पावसामुळे मोठे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांच्या तोंडातील घास हिरावला गेलेला आहे. डोणगाव व हरसुल मंडळात जवळपास 20 हजार शेतकऱ्यांनी चालू वर्षी पिक विमा भरलेला असून, शेतकऱ्यांना आता पिक विमा मिळावा अशी आशा लागली आहे. परंतु एका महसूल मंडळातील एकूण पिक विमा भरलेल्या शेतकऱ्यांपैकी किमान 25 टक्के शेतकऱ्यांच्या ऑनलाइन किंवा ऑफलाइन तक्रारी पिक विमा कंपनीकडे दाखल होत नाही तोपर्यंत त्या महसूल मंडळात सरसकट पिक विमा मंजूर होत नाही. दिनांक 20 व 21 तारखेला हर्सूल व डोणगाव मंडळात ढगफुटी सदृश पाऊस झाल्याने मोठे नुकसान झाले. तदनंतर 72 तासाच्या आत नुकसानीचे ऑनलाईन तक्रार करणे आवश्यक असल्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी ऑनलाइन तक्रारी करण्याचा प्रयत्न केला. परंतु पिक विमा कंपनीचे ऑनलाइन तक्रार करण्याचे ॲप दोन ते तीन दिवस बंद असल्याने शेतकरी तक्रारी करू शकले नाही. यामुळे शेतकरी ऑफलाइन तक्रार करण्यासाठी गेल्यानंतर पिक विमा कंपनीचे कार्यालय दिवाळीच्या सुट्टीमुळे बंद असल्याने शेतकरी हवालदिल झाले. यामुळे डोणगाव व हरसुल मंडळातील शेतकरी पिक विमापासून वंचित राहू नये म्हणून धामोरीचे उपसरपंच रवींद्र चव्हाण यांनी आमदार प्रशांत बंब यांच्या मार्गदर्शनाखाली डोनगाव व हरसुल मंडळात धामोरी डोणगाव रायपूर पिंपळगाव दिवशी पाचपीरवाडी वरझडी किन्हळ पाडलसा बाभुळगाव सावंगी सुलतानाबाद नारळा शिरेगाव वैरागड दिनवाडा सनव माळीवाडगाव दायगाव सकाळी सात ते संध्याकाळी सात असा मॅरेथॉन दौरा करत तब्बल एका दिवसात 20 गावांना भेटी दिल्या व झालेल्या पिकांच्या नुकसानीच्या तक्रारीबाबत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करुन दिनांक 20 व 21 ऑक्टोबर 2022 रोजी झालेल्या ढगफुटी सदृश पावसामुळे पिकांचे झालेल्या नुकसानीचे तक्रारीचे शेतकऱ्यांनी भरून ठेवलेले फॉर्म रविंद्र चव्हाण यांनी जमा केले.



# पोलिसांच्या कारवाईत शिरपूर येथे चौदा लाखांचा गांजा जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शिरपूर येथे एका शेतात सहा फुटांची गांजाची रोप असलेली शेती ज्याची किंमत दोन हजार रुपये किलो प्रमाणे ७२१ किलोचा एकूण १४,४२,८००/- रु किमतीचा माल स्थानिक गुन्हे शाखा यांच्या कारवाई मार्फत जप्त करण्यात आला.

पोलीस निरीक्षक हेमंत पाटील स्थानिक गुन्हे शाखा यांची दमदार कारवाई करण्यात आली गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, मोहन शामा पावरा व भावसिंग भोंग्या पावरा दोन्ही लाकडया हनुमान गावाचे शेत शिवारातील गांजा सदृश्य अंमली पदार्थाच्या वनस्पतीच्या झाडांची बेकायदेशीररित्या लागवड केलेली आहे अशी खात्रीशीर माहिती प्राप्त झाली . सदर ठिकाणी जावुन नमुद बातमीची खात्री करुन योग्य ती कायदेशीर कारवाई करणे बाबत पो . नि . श्री . हेमंत पाटील यांनी पोसई,बाळासाहेब सुर्यवंशी व स्थानिक गुन्हे शाखेकडील पथकास आदेशीत केले . पोलीस निरीक्षक श्री . हेमंत पाटील , स्थानिक गुन्हे शाखा , धुळे यांचे मार्गदर्शनाप्रमाणे पोसई बाळासाहेब सुर्यवंशी यांनी त्यांच्या पथकासह व शिरपुर तालुका



पोलीसांच्या मदतीने मिळालेल्या बातमीप्रमाणे लाकडया हनुमान गावाचे शेत शिवारातील शेतात मोहन शामा पावरा व भावसिंग भोंग्या पावरा दोन्ही रा. लाकडवा हनुमान, ता . शिरपुर, जि.धुळे हे कसत असलेल्या शेताचा शोध घेवून शेतात जावुन पाहिले असता , सदर शेतात तुर , मका व कापुस हया पिकात मध्यभागी गांजा सदृश्य अंमली पदार्थाची हिरव्या रंगाची ओले , ताजे झाडे अंदाजे ३ ते ६ फुट कमी अधिक उंचीचे एकुण ४८७ झाडांची लागवड केल्याचे दिसून आले . सदर झाडांचे वर्णन एकुण ७२१ किलो ४०० ग्रॅम वजनाचा गांजा सदृश्य अंमली पदार्थाचे वनस्पतीचे हिरवे ओले ताजे झाड , पाने फुले व फांदया असलेले मुळासह, मुळापासून ते शेंडयापर्यंत उंची अंदाजे ३ ते ६ फुटापर्यंत कमी जास्त असलेले प्रती किलो २००० रुपये अदमासे एकुण १४,४२,८०० / - रुपये किंमतीचा मुद्येमाल वरीलप्रमाणे मिळून आलेला मुद्देमाल जप्त करुन इसम नामे १ ) मोहन शामा पावरा २ ) भावसिंग भाग्या पावरा दोन्ही रा . लाकडया हनुमान ता . शिरपुर जि.धुळे यांचे विरुध्द पोकॉ / महेंद्र देवराम सपकाळ , नेम . स्थानिक गुन्हे शाखा धुळे यांनी दिलेल्या फिर्यादी वरुन शिरपुर तालुका पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई संजय बारकुंड, पोलीस अधीक्षक, धुळे, प्रशांत बच्छाव, अपर पोलीस अधीक्षक, धुळे यांचे मार्गदर्शनाखाली स्था . गु.शा.चे पो. निरी . हेमंत पाटील, सपोनि सुरेश शिरसाठ, शिरपुर तालुका पो.स्टे पोसई बाळासाहेब सुर्यवंशी स्थागुशा धुळे, पोसई संदीप पाटील, शिरपुर तालुका पो.स्टे . पोहेकॉ संदीप सरग, प्रकाश सोनार, पोकों योगेश जगताप, महेंद्र सपकाळ, राहुल गिरी, किशोर पाटील , चालक हेमंत मिस्तरी तसेच शिरपुर तालुका पो.स्टे. चे पोहेकॉ गंगाराम सोनवणे , अनिल चौधरी, पवन गवळी, उदयसिंग पवार, पोना सागर ठाकुर, आरीफ पठाण, पोकों प्रकाश भिल, मुकेश पावरा, भगवान गायकवाड, रणजीत वळवी व चापोहेकॉ सईदशेख, पोकों मनोज पाटील अशांनी केली आहे.

# मुंबई येथील राज्यस्तरीय संमेलनात हजारो कार्यकर्ते सहभागी होणार : आनंद सैंदाणे

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शासक बनो अभियानांतर्गत बहुजन समाज पार्टी महाराष्ट्र प्रदेश च्या वतीने मुंबईत दि.९ नोव्हेंबर ला राज्यस्तरीय कार्यकर्ता संमेलनाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या संमेलनाला प्रामुख्याने बसपाचे राष्ट्रीय समन्वयक युवा नेते मा. आकाश आनंदजी मार्गदर्शन करणार आहेत. याप्रसंगी विशेष अतिथी म्हणून केंद्रीय कार्यकारिणीच्या वतीने केंद्रीय समन्वयक माजी खा. डॉ अशोक सिद्धार्थ व नितीन सिंगजी उपस्थित राहतील.

सदर कार्यक्रम हा दि. ९ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजता मुंबईतील सर्वात मोठे सभागृह असलेल्या षण्मुखानंद सभागृह माटूंगा, मुंबई येथे होणार आहे. या कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी महाराष्ट्र प्रदेशचे अध्यक्ष ॲड. संदीप ताजने, प्रदेश समन्वयक ॲड .सुनील डोंगरे, प्रा प्रशांत इंगळे, मनीष कावळे, डॉ हुलगेश चलवादी यांच्या सोबतच प्रदेश महासचिव, प्रदेश सचिव, जिल्हा अध्यक्ष, विधानसभा कार्यकारणी व बसपाचे आजी-माजी पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमाचे पोस्टर लोकार्पण धम्मचक्र प्रवर्तन दिनी नागपूरच्या दीक्षाभूमीवर डॉ अशोकजी सिद्धार्थ व नितीनजी सिंग यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

त्या सोबतच राज्यभर भिंती रंगविण्याचे, पोस्टर चिटकवण्याचे तसेच संमेलन यशस्वी करण्यासाठी सभा, संमेलन व मीटिंग घेण्याचे कार्यक्रम प्रदेश पासून तर विधानसभा स्तरापर्यंत सुरू आहे. मान्यवर कांशीराम साहेबांनी महाराष्ट्रात होऊ शकत है याची लहर सुरू केली होती, ती बहन मायावतीजी यांच्या दिशा निर्देशानुसार आकाश आनंदजी ह्यांच्या नेतृत्वातील कार्यक्रमाच्या यशस्वीतेवर भर देण्यात आलेला आहे. या भव्य कार्यक्रमाच्या यशस्वीते नंतर महाराष्ट्रात बसपा शासक बनण्याच्या क्षमतेत असल्याचे निदर्शनास येईल असे मत बहुजन समाज पार्टी धुळे जिल्हा अध्यक्ष आनंद सैंदाणे यांनी व्यक्त केले आहे.

सदर कार्यक्रम हा महाराष्ट्र मध्ये संघटना मजबुतीसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. म्हणून धुळे जिल्ह्यातील कार्यकर्ते हे हजारो च्या संख्येने सहभागी होणार आहेत. असा विश्वास आनंद सैंदाणे यांनी व्यक्त केला आहे.



# अल्कन फाउंडेशनकडून भीमराव परघरमोल यांचा सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**तेल्हारा :** संपूर्ण महाराष्ट्र मध्ये कार्यरत असणाऱ्या अल्कन फाउंडेशन नासिक यांच्याकडून भिमराव परघरमोल यांचा सन्मान करण्यात आला. सविस्तर वृत्त असे की, तेल्हारा येथील भिमराव परघरमोल (लेखक, व्याख्याता तथा अभ्यासक फुले शाहू आंबेडकरी विचारधारा तेल्हारा जि. अकोला) यांचा संपूर्ण महाराष्ट्रात कार्यरत असणाऱ्या अल्कन फाउंडेशन नाशिक या संस्थेचे सचिव प्रा. राजेश गोसावी यांच्याकडून स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

कोरोना काळामध्ये त्यांनी केलेली गोरगरिबांची, गरजूंची मदत, कोरोनाबद्दल समाजामध्ये पसरलेली अंधश्रद्धा दूर करण्यासाठी केलेले लिखाण, समाजामधील अनिष्ट रूढी परंपरा यावर लेखणीच्या व व्याख्यानाच्या माध्यमातून प्रहार करत केलेले समाज प्रबोधन , भारतीय संविधानाबद्दल समाजमनामध्ये सन्मान सुरक्षा व त्याचे संवर्धन करण्याची उर्मी निर्माण व्हावी त्यासाठी राबवत असलेले (भारतीय संविधान, सन्मान, सुरक्षा तथा संवर्धन) अभियान, महापुरुषांच्या स्वप्नातील भारत आकार घेण्यासाठी घेत असलेले कष्ट, करत असलेल्या त्यांच्या विचारांचा प्रचार आणि प्रसार व त्यांचे शैक्षणिक कार्य या सर्वांची दखल घेत अल्कन फाऊंडेशन नासिक या संस्थेचे सचिव प्रा. राजेश गोसावी यांनी तेल्हारा येथे येऊन त्यांना स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन त्यांचा यथोचित सन्मान केला. त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.




# कामगारांचा पगार त्वरित अदा करा; नसता गंभीर परिणाम भोगावे लागतील

## ॲड. कृष्णा पाटील जाधव यांचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** कन्नड सहकारी साखर कारखान्याच्या कर्मचाऱ्यांचा 38 महिन्यांचा सुमारे 30 कोटी पगार व ग्रॅज्युएटीची रक्कम त्वरित कामगारांना अदा करावी, नसता गंभीर परिणामास सामोरे जावे लागेल, असा इशारा ॲड. कृष्णा पाटील जाधव यांनी महाराष्ट्र राज्य शेतकरी कामगार महासंघ आयोजित राज्यव्यापी सहकार परिषदेत राज्य शिखर बँकेला दिला आहे

नुकत्याच औरंगाबाद येथील सह्याद्री लॉन्स येथे पार पडलेल्या राज्यव्यापी सहकार मेळाव्यात बोलताना ॲड. कृष्णा पाटील जाधव म्हणाले की ,कन्नड सहकारी साखर कारखाना राज्य शिखर बँकेने केवळ 50 कोटी थकीत कर्जापोटी जप्त करून विक्री केला, त्यापूर्वी सदर कारखान्याच्या कर्मचाऱ्यांचा 38 महिन्यांचा पगार व ग्रॅज्युटी रक्कम सुमारे 30 कोटी ही कारखान्याकडे बाकी होती, कर्मचाऱ्यांनी त्याबाबत उच्च न्यायालयात धाव घेऊन दाद मागितली असता मा. उच्च न्यायालयाने सदरची

> कार्यक्रमाचे निमंत्रक मा . आ . कॉम्रेड माणिक जाधव हे म्हणाले की , राज्य शिखर बँकेने गेल्या काही वर्षात जे 49 सहकारी साखर कारखाने कवडीमोल किमतीने अवैधरित्या विक्री केले व आपल्या संचालक मंडळ व त्यांच्या बगलबच्यांना अत्यल्प किमतीत वाटून दिले, त्याबाबत ( ईडी )सक्तवसुली संचालनालय व शासनाने गंभीर दखल घेऊन संबंधितांना त्वरित अटक करावी व सदरची मिळकत जप्त करावी या आशयाचे निवेदन व प्रस्ताव शासनास देण्यात येणार असून त्यावर उचित कालावधीत शासनाने संबंधितावर आवश्यक ती कारवाई न केल्यास महासंघाचे वतीने महाराष्ट्रभर "सहकार बचाव पद यात्रे" चे आयोजन करण्यात येऊन मंत्रालयावर धडक मोर्चा काढण्यात येईल ,असाही इशारा यावेळी दिला . . तसेच यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष एडवोकेट सतीश तळेकर म्हणाले की मी न्यायालयीन लढाई लढण्यास सक्षम असून निश्चितच या प्रकरणात दोषी इसमांना अटक होऊन शिक्षा होईल व सदर अवैध मार्गाने विक्री केलेले कारखाने पुन्हा जनतेला परत मिळवून देईल, अशी ही हमी यावेळी त्यांनी बोलताना दिली .

याचिका मंजूर करून राज्य शिखर बँकेस कर्मचाऱ्यांचा पगार त्वरित अदा करण्याबाबत निर्देशित केले व साखर कारखाना विक्रीची रक्कम नो लीन अकाउंट मध्ये जमा करण्यास सांगून कर्मचाऱ्यांनी त्यांचा पगार सक्षम न्यायालयाकडून तपासून घ्यावा, असे आदेशही दिले, त्याप्रमाणे कर्मचाऱ्यांनी सक्षम न्यायालय व सक्षम अधिकाऱ्याकडून आपला पगार तपासून घेऊन तो संपूर्ण अहवाल मा. कामगार न्यायालयाकडे व बँकेकडे सुपूर्द केला, तरी देखील माननीय उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे राज्य शिखर बँकेने कामगारांचा पगार अद्याप पावेतो अदा केला नाही, त्यामुळे कामगारांनी मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे राज्य शिखर बँके विरुद्ध अवमान याचिका दाखल केली असून राज्य शिखर बँकेने कामगारांचा वरील पगार त्वरित न दिल्यास अवमान याचिकेच्या माध्यमातून होणाऱ्या गंभीर परिणामास राज्य शिखर बँकेस सामोरे जावे लागेल व त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतीलअसेही ते म्हणाले.

सदर कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातील 49 सहकारी साखर कारखान्याचे संचालक, कर्मचारी व प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका
आरोग्य हीच संपत्ती आहे

शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार



● घाऊक आणि किरकोळ ● किराणा, सुका मेवा, मसाले
● क्रॉकरी, घरगुती उपकरणे ● घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि अॅल्युमिनियम
● प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद

# पिंपळगावात कार्तिक महोत्सवास प्रतिसाद

## काकड आरतीस हजारो भाविकांची गर्दी : गावचा नूर पालटून गेला

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** पिंपळगाव (ता. हदगाव) येथील ग्रामस्थातातील एकोपा आणि भक्तीमय वातावरणाने गावचा नूरच पालटून गेला आहे. दरवर्षी प्रमाणे यंदाही कार्तिकी महोत्सवा निमित्ताने दररोज काकड आरतीसह विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने ग्रामस्थ स्मार्ट व्हिलेज करण्यासाठी सरसावले आहेत. महिनाभर सूरू असलेल्या महोत्सवात नियमित हजारो भाविक हजेरी लावत आहेत.पिपळगाव येथील ग्रामस्थ मागील अनेक वर्षांपासून गावातील सर्व जातीधर्माच्या लोकांना समवेत घेऊन एकोपा निर्माण केला आहे. ग्रामस्थ आणि दानशूराच्या सहकार्यातून भव्यदिव्य मंदिराची उभारणी करण्यात आली





पिंपळगाव येथील काकड आरतीच्या वेळी दिव्यांचा झालेला लखलखाट . दुसऱ्या छायाचित्रात ग्रामसेवक डी .एम . करपे यांचा सत्कार करताना प्रा .दत्तात्रय शंकरराव ( चोथे ) पिंपळगावकर

आहे.याच परिसरातील दरवर्षी विविध धार्मिक कार्यक्रमांचे नियोजन केले जाते.विशेषता कार्तिक मोहत्सव हा तब्बल एक महिना चालू असतो. यावर्षी हा मोहत्सव मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात येतो आहे. दररोज हजारो भक्तांच्या उपस्थितीत काकडा आरती केली जात आहे. ग्रामस्थांनी याचनिमित्ताने गाव स्मार्ट व्हिलेज करण्याचा संकल्प केला आहे. बालयोगी व्यंकट स्वामी महाराज, ग्रामसेवक डी.एम. करपे यांच्या मार्गदर्शनाखाली गावात स्वच्छता मोहिम, व्यसनमुक्ती, प्रत्येक घराला एकच रंग, नाली सफाई, वृक्षलागवड, घनकचरा व्यवस्थापन, शोषखड्डा, महिला सबलीकरण, बचतगटांची स्थापणा, केदारनाथ मित्रमंडळ, भजनी मंडळ, महिला मंडळ हे स्मार्टव्हिलेज करण्यासाठी अथक परिश्रम घेत आहेत. रविवारी सायंकाळी सहा वाजताच्या सुमारास कुमारी तनूजा गजानन चोथे ह्या बालीकेच्या वाढदिवसाच्या निमित्ताने मूक्ताईनाथ माऊली महाराज ऊदगीरकर यांच्या कीर्तणाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरूवारी (ता.१०) या महोत्सवाचा समारोप करण्यात येणार आहे.

# जातीअंताच्या भिंती दूर करणे गरजेचे : फुलारी

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** देशाची भावी पिढी घडविण्याचे काम युवा पीढिच करू शकते. त्यांना नवनवीन तंत्रज्ञान आणि सूसंस्काराची जाणीव करून द्यावी लागते.नवयूवक भरकटले जात आहेत. सध्या धर्माचा अभिनीवेश वाढला असून जातीअंताच्या भिंती दूर करणं काळाची गरज आहे.असे प्रतिपादन साहित्यिक देवीदास फुलारी यांनी रविवारी (ता ३०) केले आहे.

शहरात भोकर विकास मंचाच्या वतीने मोंढा येथील बालाजी मंदिरात गुणवंत आणि सामाजिक संस्थाचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मंचचे अध्यक्ष डॉ. उत्तम जाधव होते. व्यासपिठावर अप्पर सचिव राजेंद्र खंदारे, शंकर वाडेवाले यांची उपस्थिती होती. फुलारी म्हणाले की, भोकर शहराच्या मातीत ऊपेक्षीताच्या भल्यासाठी झटणारी माणसे आहेत. प्रारंभी आम्ही इथेच संजिवनी मित्र मंडळाची स्थापना केली होती. त्यातुन अनेकांना न्याय मिळवून दिला आहे. आता सामाजिक संस्था पुढे येऊन काम करीत आहेत ही शहराच्या बाबतीत गौरवाची बाब आहे. अशी कामे करताना काही धटिंग मंडळी दूधात खडा टाकण्यात पटाईत असतात यामुळे आपणास बळ मिळत.शेतकरी सध्या संकटांत सापडला आहे त्यांना ख-या अर्थाने दिलासा मिळणे महत्त्वाचे आहे. जातीपातीचे राजकारण करून वेगवेगळे झेंडे लावले जात आहेत. वृध्दाआश्रमाची संख्या दिवसेनदिवस वाढते आहे. यावर लगाम घालण्यासाठी चांगल्या संस्कारांची गरज आहे.असे सांगितले आहे. यावेळी सेवा समर्पणचे अध्यक्ष राजूरेड्डी लोकावाड, सावली प्रतिष्ठाणचे बी.आर.पांचाळ, प्रशांत पोपशेटवार,महेश नारलावार, एक झाड एक व्यक्ती मित्रमंडळ,एकहात मदतीचा अशा सामाजिक संस्थांचा गौरव करण्यात आला आहे. सिध्देश्वर जाधव, अविनाश राठोड, पंकज जाधव, सूरज तिडके, अहमद लालू, बंड्डु सादूलवार, दिलीप वाघमारे,योगेश गोरठकर, आनंद काळे, नारायण सादूलवार,कमीशन कोंगेवाड, व्यंकटेश सूरकर, हाडोळीच्या सरपंच अनीता अमृतवाड, नागापुरचे सरपंच दत्ता व्यवहारे, उपसरपंच बालाजी शानमवाड, खडकी,नारवट गावच्या ग्रामस्थांचा सत्कार करण्यात आला आहे. प्रास्ताविक प्राध्यापक व्यंकट माने तर अध्यक्षीय समारोप डॉ. उत्तम जाधव यांनी केले आहे. सूत्रसंचलन चंदू चंक्रवार यांनी केले. डॉ.शिवाजी कदम यांनी आभार मानले .

# बोगस आदिवासींना जातीचे प्रमाणपत्र देऊ नये : एकलव्य आदिवासी तडवी भिल्ल विकास परिषद



आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** जातपडताळणी विभागाने बोगस आदिवासी लाभार्थ्यांना त्वरीत आळा घालून त्यांना अ. जमातीचे कोनतेही जातीचे प्रमापत्र देऊनये या साठी आदिवासी संघटनांतर्फे देण्यात आले निवेदन सध्याला औरंगाबाद जातपडताळणी विभागाकडे अनुसुचित जमातीचे प्रमापत्र मिळविण्यासाठी बोगस बिगर आदिवासी आणि दलाल मोठ्याप्रमानात धाव घेताना दिसत असून या बोगस आदिवासी यांच्या बोगस प्रकाराला त्वरीत आळा घालून हा बोगस प्रकार थांबविण्यात यावा या संदर्भामधे महाराष्ट्र एकलव्य आदिवासी तडवी भिल्ल विकास परिषद या सामाजिक संघटनाने जातपडताळणी सह. आयुक्त तथा उपाध्यक्ष संगिता चव्हाण अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती औरंगाबाद यांच्याकडे निवेदन देण्यात आले. सध्याला बोगस बिगर आदिवासी घुसखोरी करुन अनुसूचीत जमातीचे प्रमापत्र मिळविण्यासाठी औरंगाबाद जातपडताळणी विभागाकडे दबाव तंत्र तय्यार करुन आदिवासी जातीचे प्रमापत्र घेण्यासाठी प्रयत्न करीत आहे आणि यामुळे खरे गोरगरीब गरजु आदिवासी समाजाचे लाभार्थी वंचित राहत आहे. तरी खरे गोरगरीब गरजू आदिवासी समाजाचे कोनतेही लाभार्थी वंचित राहु नये यासाठी महाराष्ट्र एकलव्य आदिवासी तडवी भिल्ल विकास परिषदचे प्रदेश अध्यक्ष अफसर तडवी, संघटनेचे औरंगाबाद जिल्हा अध्यक्ष नजिर तडवी, प्रदेश सल्लागार समिर तडवी, सिल्लोड तालुका अध्यक्ष सलाउद्दिन तडवी यांनी औरंगाबाद सह. आयुक्त तथा उपाध्यक्ष जातपडताळणी समिती यांच्याकडे तक्रार निवेदन देण्यात आले जातपडताळणी विभागाकडुन खुप चांगले काम कार्य केले जात असुन बोगस बिगर आदिवासींना कोनताही थारा देण्यात येत नाही बोगस गिरी थांबवुन चांगले काम कार्य केल्याबद्दल जातपडताळणी समिती सह. आयुक्त संगिता चव्हाण यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन सुध्दा करण्यात आले. बोगस बिगर आदिवासी यांना कोनतेही आदिवासी समाजाचे जात प्रमापत्र देण्यात येऊनये कुणी खुसखोरी करुन दबाव आन्याचा प्रयत्न केला. तर संपुर्ण आदिवासी समाज आणी आदिवासी सामाजिक संघटना तुमच्या सोबत आहे, असे प्रदेश अध्यक्ष अफसर तडवी आणि संघटनेचे शिष्टमंडळ यांनी सांगीतले.









# 'याद पिया की आये'च्या सादरीकरणाने रसिक मंत्रमुग्ध

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** पटियाला घराण्याच्या अग्रणी शास्त्रीय गायिका कौशिकी चक्रवर्ती यांनी सादर केलेल्या 'छब शाम की, शाम छबी मन मोह लियो' 'करुणा करो बागेश्वरी'सारख्याबंदिशी आणि 'याद पिया के आये' या सदाबहार ठुमरीच्या सादरीकरणाने औरंगाबादकर अक्षरशः मंत्रमुग्ध झाले. सोबतच तेजस आणि राजस उपाध्ये यांनी व्हायोलिन ड्युएटचा अप्रतिम असा नजराणा सादर करत रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवले. दिवाळीच्या धामधुमीनंतर गुलाबी थंडीची चाहूल लागलेली असताना पुण्याच्या व्हायोलिन अकादमीच्या वतीने रविवारी (३० ऑक्टोबर) सायंकाळी संत एकनाथ रंगमंदिरात आयोजित स्वरझंकार मैफलीने रसिकांची मने जिंकली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला तेजस आणि राजस उपाध्ये यांनी राग किरवानीने व्हायोलिन स्वर छेडायला सुरुवात करताच टाळ्यांचा कडकडाट झाला. व्हायोलिनचा एक एक गुंफला जाणारा स्वर वादकाच्या मनाचा आरसा दर्शवणारा होता. जणू काही वादकाने आपला आत्मा त्या वाद्याला अर्पिला आहे अन् त्याच्या हृदयातील निरागसता या वाद्यामध्ये अवतरली आहे असा भास होत होता. व्हायोलिनच्या स्वरलहरी संपूर्ण प्रेक्षागृहात वाहून आपल्यातली ओजमयता खुल्या हाताने देत होत्या. ही ऊर्जा या स्वरांच्या मार्फत रसिक प्रेक्षकांच्या मनी झळकत होती. स्वरांच्या परावर्तित होणाऱ्या प्रकाशमान लहरी आनंद उधळत होत्या. यातच तबल्याच्या नादाने वातावरण तरंग मय झाले आणि नादब्रम्ह उजळले गेले. तबला अन् व्हायोलिन या अभूतपूर्व युगलबंदीने नाट्यगृह दुमदुमले. व्हायोलिनड्युएटला तबल्यावर ईशान घोष यांनी उत्तम साथसंगत दिली. दुसऱ्या सत्रात पटियाला घराण्यातील शास्त्रीय गायिका कौशिकी चक्रवर्ती यांनी उपस्थितांशी संवाद साधत शांत, सौम्य नितळ अन् निरागस स्वरांच्या सयीने मनातली किल्मिष गळून पडली. विलंबित एक तालातील बंदिश 'श्याम कल्याण' उलगडून सांगू लागल्या. स्वरासोबत ते शब्द ही माधुर्यपूर्ण होते. त्या नंतर 'छब शाम की, शाम छबी मन मोह लियो' या दृत बंदिशी सजल्या. त्यानंतर वातावरण सूरावलेले ते 'करुणा करो बागेश्वरी'सारख्या बंदिशी आणि 'याद पिया के आये' या सदाबहार ठुमरीच्या माध्यमाने. या मैफलीत तबल्यावर ईशान घोष, हार्मोनियमवर मिलिंद कुलकर्णी तर सारंगीवर मुराद अली यांनी दमदार साथसंगत दिली. वैष्णवी कुलकर्णी यांनीही रसिक श्रोत्यांना भावार्थ ऐकवला. हार्मोनियम, तबला, सारंगी आणि शास्त्रीय गायनाने स्वरझंकार मैफलीची रंगत वाढवली. रसिक औरंगाबादकरांनी भरभरून दिलेल्या प्रतिसादाबद्दल व्हायोलिन अकादमीच्या वतीने राजस उपाध्ये यांनी आभार मानले.

# कर नाही त्याला डर कशाला

## पोलिसांकडून चौकशीनंतर किशोरी पेडणेकर यांची प्रतिक्रिया

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** माजी महापौर किशोरी पेडणेकर यांची आज दादर पोलिसांकडून सुमारे अडीच तास चौकशी करण्यात आली. पोलिसांनी जे प्रश्न विचारले, त्यांची मला माहिती असलेली उत्तरे दिली, असे किशोरी पेडणेकर यांनी चौकशीनंतर माध्यमांशी बोलताना सांगितले. तसेच पोलिसांनी यानंतर आपल्याला चौकशीला बोलावलेले नाही, असेही किशोरी पेडणेकर म्हणाल्या. झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पामध्ये घोटाळा केल्याचा आरोप किशोरी पेडणेकर यांच्यावर आहे. दादर पोलिसांकडून दुसऱ्यांदा किशोरी पेडणेकर यांची चौकशी झाली. चौकशीनंतर दादर पोलीस स्टेशनच्या बाहेर आल्यानंतर माध्यमांशी किशोरी पेडणेकर यांनी संवाद साधला. यावेळी त्या म्हणाल्या की, पोलिसोचे बोलावणे आले तेव्हाच मी सांगितलं की तीन दिवस मी बिझी आहे, पण मी येणार चौकशीला. कर नाही तर डर कशाला? ती म्हण मी कायम ठेवली. अडीच तास पोलिसांची चौकशी झाली. पण बराच वेळ गप्पांमध्ये गेला. पण त्यानंतर प्रश्न विचारले त्यांची मी मला माहित असलेली उत्तरे दिली. तसंच प्रत्येक आरोपांना उत्तर देण्याची गरज नाही, असा टोला किशोरी पेडणेकर यांनी किरीट सोमय्या यांनी लगावला.

ज्या पद्धतीने हे रंगवले जातंय त्यामधले दहा टक्केही खरे नाही. साप म्हणून दोरी बडवण्याचा प्रकार सुरु आहे. मी कायद्याची लढाई लढत आहे. मी कोणत्याही आरोपांना उत्तर देणार नाही. मी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भेटणार आहे. माझं निवेदन घेऊन जाणार आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि मूळ शिवसैनिक म्हणून मी त्यांना भेटणार आहे. तसेच गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांचीही भेट घेणार आहे," असे किशोरी पेडणेकर यांनी यावेळी सांगितलं.

किरीट सोमय्यांचे किशोरी पेडणेकरांवर आरोप

मुंबईच्या माजी महापौर किशोरी पेडणेकर यांच्यावर भाजप नेते किरीट सोमय्या यांच्याकडून दररोजच आरोपांच्या फैरी झडत आहेत. आधीच झालेल्या संबंधित घोटाळ्यात आरोपानंतर दादर पोलिसांकडून त्यांची चौकशी करण्यात आली. त्यानंतर याच एसआरए प्रकल्पातील सहा गाळे पेडणेकरांनी हडपले असल्याचाही आरोप सोमय्यांनी केला आहे. आता याच प्रकरणात खोट्या सह्या करुन नातेवाईकांच्या नावे घोटाळा केल्याचाही आरोप सोमय्या यांनी केला आहे.

## बर्निंग बस



पुण्यातील येरवडा शास्त्रीचौकात शिवशाही बसने अचानक पेट घेतला. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही.

# अजिंठा बुद्ध लेणी येथे धम्म परिषदेचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील फर्दापूर येथील अजिंठा बुद्ध लेणी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिसर्च इन्स्टिट्यूट ऑफ पाली अँड बुद्धिझम धम्माचलच्या वतीने दि. ८ नोव्हेंबर (कार्तिक पौर्णिमा) मंगळवार २०२२ रोजी १७ व्या अखिल भारतीय धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले असून नियोजित कार्यक्रमाचे ठिकाण धम्माचल अजिंठा बुद्ध लेणी फर्दापुर हे असून जगप्रसिद्ध असलेली अजिंठा बुद्ध लेणी सह्याद्रीच्या पर्वतरांगेमध्ये फर्दापूर गावापासून दोन किलोमीटर अंतरावर आहे. तेथे असलेला धम्माचलचा परिसर हा एकूण ७४ एकरचा असून तेथे तथागत गौतम बुद्धांची मूर्ती बनवण्यासाठी राजस्थान राज्यांमधून दगड आणण्यात आला. त्या दगडामधून दोन कारागिराने टप्प्याटप्प्याने त्या दगडाचे काम करून ३२ फूट उंच अशी भव्य दिव्य ध्यानस्थ आसनात असलेली तथागत गौतम बुद्धांची मुर्ती सन २०१३ मध्ये प्रतिष्ठापित केली. भविष्यामध्ये धम्माचलच्या ७४ एकर जमीन परिसरामध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर



इन्स्टिट्यूट ऑफ पाली अँड बुद्धिझम यांच्या आराखड्यानुसार नालंदा तक्षशिला या सारखे मोठ मोठे विद्यापीठ होणार आहे. त्या ठिकाणी होणा-या विदयापीठात दहा हजार विद्यार्थी शिक्षण घेऊ शकेल एवढ्या समतेचे विद्यापीठ होणार आहे. तथागत गौतम बुद्धांची ३२ फूट भव्य दिव्य मूर्ती जी प्रतिष्ठापित केली आहे ती मुर्ती बनवण्यासाठी आतापर्यंत सुमारे दीड कोटी रुपये खर्च निधी करण्यात आलेला आहे त्यामध्ये ४०× ७० भिक्खू निमूर्ती बांधकाम करण्यात आले आहे. धम्माचलच्या परिसरामध्ये भविष्यामध्ये भरपूर प्रकारचे उपक्रम राबविण्यात येणार आहे.

अजिंठा लेण्याची निर्मिती ई. सन पूर्व दुसऱ्या शतकात झाली. अजिंठा लेण्याचा अगदी प्राचीन उल्लेख इजिप्तमधील अलेक्सझांडर येथील प्रसिद्ध भूगोल व्यक्त नावाने केलेला आढळतो कारला, भाज्या, कणेरी ,नाशिक, पितळखोरा, वेरूळ, आणि अजिंठा, ही प्राचीन भारतातील व्यापारी दळणवळणाच्या मार्गावर बसली होती त्या मार्गाला सार्थ वाहत असे म्हटले जात असे चंद्रगुप्त मौर्याने गांधर प्रदेश जिंकून मगदराजाला जोडल्यावर अशोकाच्या काळात या प्रदेशात बुद्ध धर्माचा चांगला प्रसार केला प्रसार झाला चंद्रगुप्त मौर्य यांनी इसवी सन पूर्व ३२४ ते इसवी सन पूर्व ३०० त्यांचा नातू सम्राट अशोक इसवीसन पूर्व २७४ ते इसवी सन पूर्व २३२ यांच्या साम्राज्यात महाराष्ट्राचा समावेश होता. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या धम्मदीक्षा अगोदर भारतात ठराविक बुद्ध विचारवंत व दर्शनीक होते धर्मानंद कोसंबी राहुल सांस्कृत अनाधारिक धम्मपाल जगदीश कश्यप डॉक्टर भदंत आनंद कोसल्य यांना भदंत धम्मरक्षित यांचा नाम उल्लेख येतो त्याचा धागा धरून ऐतिहासिक वारसा जतन करण्याच्या पवित्रेतूने अजिंठा लेणीच्या पायथ्याशी उपरोक्त संस्थेच्या विद्यमाने जनतेच्या दान देणगी मधून थोडी थोडी करून ७४ एकर जमीन संस्थेने उपासकांच्या श्रद्धा बळावर विकत घेतलेली आहे सन २००६ पासून या ठिकाणी दरवर्षी कार्तिक पौर्णिमेला सातत्याने अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषद भरवण्यात येते. या १७ व्या अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषदेचे धम्म् ध्वजारोहन सकाळी १०:०० वाजता भदन्त धम्मसेवक, महाथेरो,(अध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश भिक्खु संघ)(मुळावा) यांच्या हस्ते होणार आहे. तसेच कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून भिक्खु लामा रंगड्रोल, राष्ट्रः (सिएटल,अमेरिका) कार्यक्रमाचे अध्यक्ष भिक्कू ताईजो इमानाका (राष्ट्रः जपान) धम्माचल स्मरणिका प्रकाशन, भदंत चंद्रबोधी महाथेरो,(इंग्लंड) आपले सदधम्मातील अध्यक्ष डॉ.एस. पी. गायकवाड, सचिव भदंत डॉ.उपगुप्त महाथेरो, सर्व भिक्खु संघ उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. सकाळी ०९:०० वाजता फरदापुर गावामधून धम्माचल पर्यंत बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची धम्म मिरवणूक काढण्यात येईल. तरी धम्म कार्यात सर्व उपासक,उपासिका यांनी उपस्थित राहून धम्म परिषदेचा लाभ घ्यावा व सर्वतोपरी सहकार्य करावे. सूचना : ३० आक्टोम्बर ते ८ नोव्हेंबर पर्यन्त अंशकालीन श्रामनेर शिबिराचे दीक्षा विधीचे दहा दिवसाकरिता प्रशिक्षण शिबीर उपासक,उपासिका यांच्या साठी आयोजित करण्यात आले आहे. इच्छुकांनी सहभाग नोंदवावा. असे आवाहन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे प्रमुख केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री तथा जालना लोकसभा मतदार संघाचे खासदार रावसाहेब दानवे, महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट कृषीमंत्री तथा अब्दुल सत्तार आमदार सिल्लोड सोयगाव विधानसभा आदींची उपस्थिती राहणार असल्याचे आयोजकांनी सांगितले आहे.

# सावित्रीबाई फुले विद्यालयतर्फे 'एकता दौड'




आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** जामनेर तालुक्यातील पहूर येथील महात्मा फुले शिक्षण संस्था संचलित सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयातर्फे आज राष्ट्रीय एकता दिनानिमित्त एकता दौड चे आयोजन करण्यात आले. एकता रॅलीचे उद्घाटन क्रिडा शिक्षक हरिभाऊ राऊत यांच्या हस्ते झाले. शाळेच्या मैदानापासून खर्चाने फाट्यापर्यंत एकता दौडच्या आयोजन करण्यात आले. एकता रॅलीत शिक्षक शंकर भामेरे , लिपीक प्रकाश जोशी यांच्या शाळेचे विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पल्लवी वानखेडे यांच्या अध्यक्षतेखाली दिवंगत पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त प्रतिमेचे व दिवंगत गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

काही गुप्त गोष्टी
कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी,
वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व
उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.
नवजीवन
आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# कन्नड बारामती ॲग्रोचा गळीत हंगाम सुरू

## जुन्या कामगारांची मात्र फरफट सुरूच : बारामतीचे सुभाष गुळवेंनी माध्यमाशी बोलणे टाळले

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** सहकारी साखर कारखाना राज्य शिखर बँकेने केवळ 50 कोटी थकीत कर्जापोटी जप्त करून बारामती ॲग्रोला कवडी मोलात विक्री करून घश्यात घातला त्यापूर्वी सदर कारखान्याच्या जुन्या कर्मचाऱ्यांचा 38 महिन्यांचा पगार व ग्रॅज्युटी रक्कम सुमारे 30 कोटी ही कारखान्याकडे बाकी होती, कर्मचाऱ्यांनी त्याबाबत उच्च न्यायालयात धाव घेऊन दाद मागितली असता उच्च न्यायालयाने सदरची याचिका मंजूर करून राज्य शिखर बँकेस कर्मचाऱ्यांचा पगार त्वरित अदा करण्याबाबत निर्देशित केले व साखर कारखाना विक्रीची रक्कम * नो लीन * अकाउंट मध्ये जमा करण्यास सांगून कर्मचाऱ्यांनी त्यांचा पगार सक्षम न्यायालयाकडून तपासून घ्यावा, असे आदेशही दिले, त्याप्रमाणे कर्मचाऱ्यांनी सक्षम न्यायालय व सक्षम अधिकाऱ्याकडून आपला पगार तपासून घेऊन तो संपूर्ण अहवाल कामगार न्यायालयाकडे व बँकेकडे सुपूर्द

> गळीत हंगाम सुरू करण्यासाठी बारामतीचे कन्नड युनिटचे उपाध्यक्ष सुभाष गुळवे यांनी पत्रकार परिषद घेतली यामध्ये आमचे प्रतिनिधी यांनी कन्नड युनोची चौकशी लागली आहे काय तसेच कामगाराच्या थकीत वेतनाबद्दल विषय घेतल्यानंतर गुळवे यांनी बोलण्यास नकार दिला .

केला, तरी देखील माननीय उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे राज्य शिखर बँकेने कामगारांचा पगार अद्याप पर्यत दिला नाही तेव्हाच जर घेणार देणार यांनी कर्मचारीचे थक्कीत वेतन दिले असते तर तालुक्यातील कारखान्याचे कर्मचारी आज देशोधडीला लागला नसता त्यावर उपासमारीची वेळ आली नसती परंतु बारामती ॲग्रो व शिखर बॅकीच्या अश्या बेजबाबदार वागण्यामुळे कित्येकांचे संसार उदवस्त झाले कित्येकांचे जिव गेले कित्येक मुला मुलींचे शिक्षण गेले पैशा अभावि कित्येकांना रोगाने पछाडले दुखन्या मुळे मुत्युस कौटाळले हीच का यांची पवारशाही जनतेचे कैवारी कामगारांना देशो धडीला लावुन आपण आज दिमाखात गळीत हंगाम सुरू करत




आहात हे योग्य वाटत का ? त्यांच्या मुत्युस जबाबदार ठरणार का ? असे हया प्रश्नांना उधान येत आहे खरच कन्नड तालुक्यातील कामगारास न्याय दयायचा असे तर आपण हुन पुढे येऊन यावर त्वरीत तोडगा काढुन तालुक्याचे मने जिंकावी व कामगारच्या हाल अपेष्टा थांबवाव्या असे ही कामगार बोलत आहेत. खरच याकडे बारामती ॲग्रो व शिखर बँक लक्ष देऊन जुन्या कामगारांना न्याय देणार का या कडे सर्वांचं लक्ष लागलं आहे .




# अवैध वाहतूक करणाऱ्यांवर कठोर कारवाही करण्यात येईल : सोनावणे

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** रेल शिवारातुन अवैध दगड वाहतूक करणारा ट्रक्टर क्रमांक MH 20 AB 3449 नायब तहसीलदार मोनाली सोनाली यांनी जप्त करून तहसील कार्यालयात लावण्यात आला आहे. सदरील कार्यवाही जिल्हाधिकारी औरंगाबाद आस्तिककुमार पांडे, उपविभागीय अधिकारी जनार्दन विधाते आणि तहसीलदार संजय वारकड यांच्या मार्गदर्शनाखाली निवासी नायब तहसीलदार मोनाली सोनवणे व यांच्या पथकाने केली.

# माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन



आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** श्रीरामनगर येथे स्वर्गीय राष्ट्रमाता माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमासाठी यावेळी वार्डातील कॉँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते अंकुशराव चौधरी, कॉम्रेड भास्कर लहाने, सुभाष पाटील पांडभरे यांनी कार्यक्रमाचे प्रस्तावित केले. सुभाष शुक्ला, दीपक मस्के, दशरथ मानवतकर, तायडे साहेब, चंदू भाऊ काळे, रामेश्वर शिंदे, शिवाजी काळे, अतुल इंगळे, एडवोकेट मिलिंद काकडे, बनसोडे साहेब, तुकाराम साबळे, टोम्पे मामा, लक्ष्मण मुळे, गोपीनाथ मगरे यांच्या हस्ते राष्ट्रमाता इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. राष्ट्रमाता इंदिरा गांधी यांचे बलिदान व देशासाठी दिलेल्या गांधी घराण्याच्या बलिदान वर व पूर्वीपासून गांधी कुटुंबियाचं देशासाठी असलेले कार्य व त्यांच्या कुटुंबीयांनी दिलेले बलिदान या विषयावर विस्तृत मार्गदर्शन केले यावेळी कार्यक्रमाचे आयोजन सुभाष चंद्रमणी काळे तुकाराम साबळे रामेश्वर शिंदे यांनी केले. आभार प्रदर्शन दीपक मस्के यांनी केले सूत्रसंचालन दशरथ मानकर यांनी केले.

# गाव हागणदारी मुक्तीसाठी धामोरीचे उपसरपंच चव्हाण पहाटेच रस्त्यावर



आधुनिक केसरी न्यूज

**धामोरी :** ग्रामपंचायत धामोरी खुर्द ता. गंगापूर येथील जवळपास 99 टक्के कुटुंबांनी शौचालय बांधलेले आहे. परंतु तरीदेखील उघड्यावर शौचास जाण्याचे प्रमाण कमी होत नसल्याने मागील दहा दिवसापासून ग्रामपंचायतीकडून गावकऱ्यांना सूचना देण्यात येतात देण्यात येत होत्या की, 01 नोव्हेंबर 2022 पासून जर कोणी उघड्यावर सौचास बसलेले दिसले तर एक हजार रुपये दंड आकारण्यात येईल.

त्यानुसार दि. 01 नोव्हेंबर च्या पहाटेच उपसरपंच रवींद्र चव्हाण हे रस्त्यावर पाहणीसाठी उतरले. यावेळी 22 जणांना प्रत्येकी एक हजार रुपये दंड त्यांनी आकारला. जोपर्यंत हा दंड भरीत नाही, तोपर्यंत ग्रामपंचायतीकडून कोणतेही कागदपत्र संबंधित नागरिकांना देण्यात येणार नसल्याचे रवींद्र चव्हाण यांनी सांगितले. पहिल्या दिवशी बावीस नागरिकांना 1000 हजार रुपये दंड आकारल्यामुळे उघड्यावर शौचास जाणाऱ्यांची तारांबळ उडाली.

> कृपया सर्व गावकऱ्यांना नम्र विनंती आहे की कोणीही उघड्यावर शौचास बसू नये . कोणत्याही परिस्थितीत गाव हागणदारी मुक्त केल्याशिवाय थांबणार नाही
>
> **– रवींद्र चव्हाण, उपसरपंच, धामोरी (खुर्द)**



# गवंडी कामगाराचा मुलगा झाला पॅरा कमांडो

## अतिशय खडतर व अवघड प्रशिक्षण पूर्ण करून मिळविले यश

आधुनिक केसरी न्यूज

**रामभाऊ आवारे**

**निफाड :** वाकी खुर्द तालुका चांदवड येथील जयदीप जाधव या युवा व होतकरू तरुणाने दाखवून दिले असून निश्चितच तालुका, जिल्हा, महाराष्ट्र व देशासाठी ही अभिमानाचीच बाब आहे असे म्हणणे वावगे ठरणार नाही. केल्याने होत आहे रे आधी केलेची पाहिजे. या उक्तीप्रमाणे जिद्द, मेहनत ,साहस व चिकाटी या गुणांचा वापर करून चांदवड तालुक्यातील वाकी खुर्द गावचे भूमिपुत्र जयदीप गंगाधर जाधव यांनी भारतीय सैन्यदलातील अतिशय कठीण व खडतर असे प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करून "पॅरा कमांडो स्पेशल फोर्सेस, इंडियन आर्मी) होण्याचा बहुमान मिळविला असून त्याच्या याच्याबद्दल लासलगाव सह परिसरातील सर्व हितचिंतकांनी अभिनंदनचा वर्षाव केला आहे. जयदीप गंगाधर जाधव यांची २०२१ साली भारतीय सैन्य दलाच्या मराठा बटालियनमध्ये निवड झाली होती. त्यानंतर त्यांनी बेळगाव येथे नऊ महिन्याचे प्रशिक्षण पूर्ण करून त्यांची सिक्कीम येथे पोस्टिंग झाली होती. परंतु दरम्यानच्या काळातच त सर्व भारतातून पॅरा कमांडो च्या ट्रेनिंग साठी 30 उत्तम फौजदारांमध्ये त्यांना निवडण्यात आले होते. तेव्हापासून गेली चार महिने बेळगाव व आग्रा येथे येथे अतिशय खडतर व अवघड समजले जाणारे प्यारा कमांडो चे प्रशिक्षण त्यांनी त्यातील प्रत्येक टेस्ट व परीक्षा पार करत सदरचे संपूर्ण प्रशिक्षण हे यशस्वीरित्या पूर्ण करून 30 फौजदारांपैकी अंतीम 12 फौजदारामध्ये त्यांना "प्यारा कमांडो"( PARA COMMANDO )2 प्यारा स्पेशल फोर्सेस) म्हणून निवडण्यात करण्यात आली आहे .हिंदी मधले एक सुभाषित आहे जे असे की" जितना बडा संघर्ष होगा उतनी ही शानदार जीत होगी"!! एका अतिशय गरीब कुटुंबातून पुढे येऊन प्रयत्नांची पराकाष्ठा करून जयदीप जाधव यांनी हे यश संपादन केले आहे. त्यांचे वडील गंगाधर पोपटराव जाधव हे गवंडी काम करतात तर आई ही कावेरी जाधव ही अंगणवाडीत मदतनीस असून त्यांचे बंधू ऋषिकेश गंगाधर जाधव हे इंडियन आर्मी मध्ये सेना पोलीस या पदावर कार्यरत आहेत. तसेच त्यांचे चुलते श्री युवराज पोपटराव जाधव व शिवनाथ पोपटराव जाधव हे देखील भारतीय सैन्य दलात हवालदार या पदावर कार्यरत आहेत. सामाजिक कार्यकर्ते तसेच श्री गजानन कॉम्प्युटरचे संचालक श्री किशोर पोपटराव जाधव यांचे ते पुतणे असून श्री पोपटराव दगुजी जाधव यांचे नातू आहेत.

या यशाबद्दल जि प सदस्य डॉ आत्माराम कुंभार्डे,जि प सदस्य डि के नाना जगताप, लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती सौ सुवर्णाताई जगताप,नामको बँकेचे उपाध्यक्ष प्रकाशशेठ दायमा, पं समिती सदस्य शिवा पाटील सुरासे, वाकी खुर्द चे सरपंच अरुण देवढे मा. सरपंच विक्रम जगताप, चांदवड तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेस अध्यक्ष दत्तात्रय वाघचौरे ,माजी प.सं चांदवड सभापती प्रकाश देवढे, ब्राह्मण महासंघाच्या प्रदेश कार्याध्यक्ष सौ स्मिताताई कुलकर्णी,



लासलगाव विकास संस्थेचे मा अध्यक्ष राजाबाबा होळकर, प्राचार्य सी डी रोटे, निलेश लचके, राष्ट्रवादी कॉंग्रेस जिल्हा सरचिटणीस बबनराव शिंदे, शिवसेना तालुकाप्रमुख प्रकाश पाटील, रविराज शिंदे, केशवराव जाधव, ज्ञानेश्वर कृषी सेवा संचालक ईश्वर जाधव, समीर देवढे सर ,मनिष चोपडा आदींनी अभिनंदन केले आहे.



# हरी ओम चित्रपटातील संवाद काढून टाकणे हे मुंबईत भेळपुरी विकण्याचे काम नाही : घाडगे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** १४ ऑक्टोबरला प्रदर्शित होणाऱ्या 'हरिओम' या मराठी चित्रपटाचा वाद वाढत चालला आहे. चित्रपटातील एका संवादावर समाजवादी पक्षाने आक्षेप घेतला आहे. चित्रपटाच्या या डायलॉगचा निषेध होत आहे. चित्रपटातील एका दृश्यात एक संवाद आहे की हा तुमचा महाराष्ट्र आहे, तुमचा गाव नाही. हा संवाद चित्रपटातून काढून टाकण्याची मागणी समाजवादी पक्षाने केली आहे. 'पुरुषोत्तम भैया, हा आमचा महाराष्ट्र आहे, तुमचे गाव नाही. मराठी अडकले तर आम्ही तुम्हाला महाराष्ट्राच्या नकाशावरून पुसून टाकू. चित्रपटातील उत्तर भारतीयांबद्दल चुकीचे शब्द काढून टाकावेत, अशी मागणी समाजवादी पक्षाने केली. चित्रपटाचे निर्माते आणि नायक हरी ओम घाडगे यांनी सांगितले की, समाजवादी पक्षाचे नेते अबू असीम आझमी यांनी चित्रपटातून हरी ओमचे संवाद काढून टाकण्याची मागणी केली असून अन्यथा चित्रपट चित्रपटगृहातून काढून टाकण्यात येईल, असे म्हटले आहे. हरी ओम या मराठी चित्रपटातील संवाद काढून टाकणे किंवा चित्रपटगृहातून चित्रपट काढून टाकणे हे मुंबईत येऊन भेळपुरी विकण्याइतके सोपे नाही, असे सडेतोड उत्तर चित्रपट निर्माता आणि अभिनेते हरी ओम घाडगे यांनी दिले.

मुंबईतील दादर येथील प्लाझा थिएटरमध्ये मराठी एकीकरण समितीच्या सहकार्याने पत्रकार परिषदेचे आयोजन करून हरिओम घाडगे यांनी ही माहिती दिली. या चित्रपटाचा एक विशेष शो देखील येथे आयोजित करण्यात आला होता, जो सर्वांच्या पसंतीस उतरला होता. चित्रपटाचे निर्माते आणि नायक हरी ओम घाडगे यांनी सांगितले की, हा चित्रपट काल्पनिक कथा आहे. या चित्रपटात काहीही आक्षेपार्ह संवाद नसल्याचे आम्ही मराठी एकीकरण समितीसोबत पत्रकार परिषदेत सांगितले. चित्रपटाची कथा म्हणजे परिस्थितीनुसार नायक किंवा खलनायकाचे संवाद, लोकांनी चित्रपट पाहावा, त्यांना आणखी चांगला मराठी सिनेमा पाहायला मिळेल. ही एक काल्पनिक कथा आहे, त्यावर कोणतीही गडबड करण्यात अर्थ नाही. हा चित्रपट समाजाला, तरुणांना एक संदेश देतो, त्यात कोणतेही आक्षेपार्ह दृश्य किंवा संवाद नाही. हरी ओम कोकणासह महाराष्ट्रातील अनेक चित्रपटगृहांमध्ये हा चित्रपट यशस्वीपणे चालू आहे. हरी ओम 2 चा विषय आणि कथा तयार असल्याचेही त्यांनी जाहीर केले आहे. त्याचा सिक्वेल मराठी, हिंदीसह अनेक भाषांमध्ये प्रदर्शित होणार आहे.

या चित्रपटात लहान भावाची भूमिका साकारणाऱ्या गौरव कदमने सांगितले की, मी या चित्रात ओमची भूमिका साकारली आहे. दादासाहेब फाळके यांनी चित्रपटांतून पदार्पण केले, मराठी चित्रपटांना योग्य तो सन्मान मिळावा. मराठी सिनेमांना संध्याकाळी नव्हे तर सकाळी शो दिले जातात. तुमचा वाढदिवस अनाथाश्रमात साजरा करा, असा संदेश हरी ओम या चित्रपटात देण्यात आला आहे.

मराठी एकीकरण समितीचे अध्यक्ष प्रदीप सावंत म्हणाले की, दादासाहेब फाळके यांचा फोटो प्रत्येक सिनेमागृहात लावला पाहिजे. या संदर्भात आम्ही भारतभर मोहीम राबवणार आहोत. हरी ओम खूप चांगला सिनेमा आहे, उत्तम ॲक्शन आहे.

हरी ओम घाडगे पुढे म्हणाले की मी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांना विनंती करतो की आमचा चित्रपट करमुक्त करावा. प्लाझा थिएटरमध्ये झालेल्या पत्रकार परिषदेत हरी ओम घाडगे, गौरव कदम, संचालक आशिष नेवाळकर, वंदना मोरे (ततारणी ब्रिगेड), संजय यादव राव आणि प्रदीप सावंत उपस्थित होते.

श्री हरी स्टुडिओच्या बॅनरखाली, दमदार ॲक्शन मराठी चित्रपट "हरिओम" दोन भावांच्या कथेवर आधारित आहे. चित्रपटात हरी ओम घाडगे याने मोठ्या भावाची भूमिका साकारली आहे तर ओमची भूमिका गौरव कदमने साकारली आहे.

हरी ओम या चित्रपटाचे दिग्दर्शन आशिष नेवाळकर यांनी केले आहे.

हरी ओम घाडगे म्हणतात, हा चित्रपट मराठी माणसाची ओळख दाखवतो, मराठी माणूस काय करू शकतो, हे या चित्रपटातून दाखवण्यात आले आहे. यामध्ये दोन भावांचे प्रेम दाखवण्यात आले आहे, जे आजच्या समाजात क्वचितच पाहायला मिळते. लोकांना प्रेरणा मिळावी या उद्देशाने हा चित्रपट बनवण्यात आला आहे.

चित्रपटाचे निर्माते आणि मुख्य अभिनेते हरिओम घाडगे म्हणाले की, प्रेक्षक चित्रपटगृहात कुटुंबासह चित्रपट पाहू शकतात. चित्रपटाचे संगीत उत्कृष्ट आहे. त्याची कथा, आशय हृदयाला भिडणारा आहे. हरी ओम या चित्रपटाची खासियत म्हणजे यातील सर्व धोकादायक स्टंट आम्ही दोघी भावांनी स्वतः केले आहेत, बॉडी डबलचा कुठेही वापर केलेला नाही. हा पहिला मराठी चित्रपट आहे ज्याची सर्व क्रिया मनाला भिडणारी आहे. दोन भावांचे नाते, त्यांचा त्याग दाखवला आहे. तरुण पिढीला प्रेरणा आणि प्रेरणा देणारे अनेक संदेश या चित्रात आहेत. असे स्टंट मराठीत प्रथमच पाहायला मिळत आहेत. यासाठी खूप मेहनत घ्यावी लागली. आम्ही दोघी कलाकारांनी 8 महिने एकत्र सराव केला. त्याने आपल्या फिटनेसकडे खूप लक्ष दिले. तरुणांसाठी हा चित्रपट आपली सभ्यता, संस्कृती आणि आपल्या मुळांशी जोडलेले राहण्याविषयी बोलतो.

# नागपुरात वन्यजीवांमधील आजारांवर संशोधन

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** जगामध्ये मोठ्या प्रमाणात प्राण्यांपासून मनुष्यांमध्ये जाणारे आजार वाढत आहेत. कोरोनासारख्या आजाराने त्याची भयानक दृश्ये जगाला दाखवली आहे त्यामुळे वेळीच प्रतिबंध करण्यासाठी जागतिक दर्जाचे या संदर्भातील संशोधन नागपुरात व्हावे, अशी अपेक्षा वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केली. नागपूरातील गोरेवाडा येथील वन्यजीव संशोधन व प्रशिक्षण केंद्रात संशोधन प्रकल्पाचे उद्घाटन वनमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले.

ईशान्य भारतासह अन्य भागाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील या संशोधन केंद्राचे उद्घाटन त्यांनी केले. यावेळी संबोधित करताना त्यांनी जागतिक दर्जाचे संशोधन या ठिकाणी होण्याची अपेक्षा व्यक्त केली. नागपूर हे भारताचे मध्यवर्ती ठिकाण असून या ठिकाणच्या वन्यजीव संशोधन केंद्रात होत असलेले हे संशोधन महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब आहे. वन्यजीवांपासून माणसांमध्ये येणाऱ्या आजारांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. आता मनुष्याचे आणि प्राण्यांचे वेगळे आरोग्य न बघता दोघांचेही एकच आरोग्य अशा पद्धतीने याकडे बघणे



आवश्यक आहे. त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यालाच अधिक महत्त्व देणे गरजेचे आहे. मात्र या संशोधन क्षेत्रात भारताची भरारी अजून बाकी आहे. ही जबाबदारी आता नागपूरच्या केंद्राने घ्यावी, यासाठी निधीची कमतरता पडणार नाही, या संशोधन केंद्राच्या सर्व अडचणी दूर करण्यात येतील, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी भंडारा-गोंदियाचे खासदार सुनील मेंढे, माफसुचे कुलगुरु डॉ.आशिष पातूरकर, वन्यजीव संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे संचालक डॉ.एस.व्ही. उपाध्ये, प्रकल्पाचे सल्लागार डॉ. अरुण कुमार रावत, वनविकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विकास गुप्ता, मुख्य वन्य संरक्षक वाय एल पी राव, आदींची यावेळी उपस्थिती होती.

महागाईने सर्वसामान्य नागरिक मेटाकुटीला आले असताना आता बाळासाहेब ठाकरे गोरेवाडा प्राणी उद्यानातील प्रवेश शुल्कात दिलेली सवलत रद्द करण्यात आली. त्यामुळे गोरेवाडा प्राणिसंग्रहालयात पर्यटनासाठी पर्यटकांना जादाचे पैसे मोजावे लागणार आहे. उद्घाटनाच्या वेळेस राज्य सरकारने एक वर्षासाठी 25 टक्के तिकिटावर सवलत देण्याचे जाहीर केले होते. मात्र, कोरोनाच्या वाढलेल्या प्रादुर्भावामुळे अद्यापही ही सवलत सुरु होती. ती सवलत आता 15 नोव्हेंबरपासून रद्द करण्यात येणार असल्याने आता अधिकचे शुल्क मोजूनच गोरेवाड्यातील पर्यटनाचा आनंद घ्यावा लागणार आहे. तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत 26 जानेवारी 2021 रोजी बाळासाहेब ठाकरे गोरेवाडा प्राणी उद्यानातील इंडियन सफारीचे उद्घाटन झाले. त्यावेळी सफारीसाठी निर्धारित केलेल्या दरात 25 टक्के सवलत एक वर्षासाठी जाहीर केली होती.

# लेणीतील बुद्धाचे कोरीव शिल्प पाहून बौद्ध भिक्खू भारावले

आधुनिक केसरी न्यूज

**गोकूळसिंग राजपूत**

**सोयगाव :** जगप्रसिद्ध अजिंठा बुद्ध लेणी मध्ये दिः३१/१०/२२सोमवा रोजी विविध देशांतून आलेल्या 40 भिक्खु संघाने जगप्रसिद्ध अजिंठा बुद्ध लेणीला भेट दिली लेणीच्या पायथ्याशी असलेल्या महाराष्ट्र पर्यटन महामंडळचे रेस्टॉरंट मध्ये थायलंड,म्यानमार, व्हिएतनाम, लाओस या देशासह भारताच्या विविध भागांतून आलेल्या भिक्खु संघाला लेणी बघण्याचा अगोदर सकाळी 11 वाजता रिसर्च इन्स्टिट्यूट ऑफ पाली अँड बुद्धिजम धम्माचल येथील सचिव भदन्त डॉ.उपगुप्त महाथेरो, यांनी त्यांच्या कडून आलेल्या 40 भिक्खु संघाला एम टी डी सी रेस्टॉरंट मध्ये भोजन दान देण्यात आले. भोजन दान झाल्या नंतर या सर्व भिक्खु संघाने अजिंठा बुद्ध लेणी बघण्यासाठी सुरुवात केली. त्यांना तथागत गौतम बुद्ध यांच्या जीवनावरील जातक कथा सांगून माहिती देण्यासाठी फर्दापुर येथील माजी केंद्र प्रमुख कोटीये यांनी सविस्तर माहिती दिली.विविध देशातील हे 40 भिक्खु संघ आनंदीत होऊन लेणी क्रमांक,26 मध्ये गौतम बुद्ध मूर्ती समोर नतमस्तक होऊन वंदन केले. त्यावेळी, भन्ते चरण सुथि,भन्ते सुरीयान,सुकीयॉनयॉंग ,भन्ते क्रायझम(व्हिएतनाम) खांता, भन्ते सलकजय,खोंनट्रॉग,(थायलंड)भन्ते रक्खीता, भन्ते नंदवंश,भन्ते नेपुना,(म्यानमार) आदि 40 हुन अधिक भिक्खुं संघा सह अमेरिका देशाचे रिचार्ड डिक्से, वांगमो डिक्से, बुद्धगयाचे धर्मराज रंजनकुमार, फर्दापुर येथील धम्म बांधव



माजी पंचायत समिती सदस्य, विजय तायडे,कृष्णा भंडारे,भारत शिंदे या बौद्ध उपासकांची भिक्खु संघा सोबत उपस्थिती होती. अजिंठा बुद्ध लेणी बघितल्या नंतर हे सर्वच वंदनीय बौद्ध भिक्खु संघ जगप्रसिद्ध अजिंठा लेणी तील बुद्धाचे कोरीव शिल्प पाहुन व लेणीतील निसर्ग सौंदर्य पाहुन भारावले. हे पाहुन झाल्यानंतर सर्व भिक्खु संघांचा ताफा हा धम्माचलच्या दिशेने रवाना झाला, धम्माचल येथे, सर्व 40 भिक्खु संघाचे धम्माचलचे सचिव,डॉ. उपगुप्त महाथेरो, भन्ते बोधीधम्मा,भन्ते पय्यावंश, भन्ते काश्यप, माजी पंचायत समिती सदस्य, विजय तायडे,धम्म बांधव किरण जोगदंड,यांच्या हस्ते सर्व भिक्खु संघाचे पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला व धम्माचल येथील बुद्ध मूर्ती जवळ बुद्धम् शरणम् गच्छामि, धम्मम् शरणम् गच्छामि, संगम् शरणम् गच्छामि अशा या मंगलमय स्वरने धम्माचलच्या परिसरात आवाज धुमुन कानी पडत होता. बुद्धवंदना घेण्यात आली. फर्दापुर येथील उपासक, उपासिका यांनी अथक परिश्रम घेतले.